साप्ताहिक २४/३१ ऑगस्ट ८५ | २ रुपये

# माणूस



## शेअर्स शेअर्स

## नवे मृगजळ?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : पंचविसावे

अंक : तेरा व चौदा

¤

२४/३१ ऑगस्ट १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

यापुढील 'माणूस' अंक ७ व १४ सप्टेंबरचा जोड अंक प्रसिद्ध होईल.

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

### संत लोंगोवाल

# वीरमरण

इंदिराजी गेल्या तेव्हाच कोणीतरी हे म्हणायला हव होतं-अस म्हटलेलं इदिराजीनाही आवडल असतं, खैर तेव्हा नाही, आता म्हणायला हवं. सत हरचदसिह् लोगोवाल याना वीराच मरण आलं पंजाबला एका आशादायक उबरठ्यावर आणून ठेवल्यानतर गुरू ग्रथसाहेबाचं दर्शन घेत असताना त्यानी प्राण ठेवले. देव त्यांच्या आत्म्याला सद्गती देवो अशी औपचारिक प्रार्थना करायचं कारणच नाही. कारण ज्या दिवशी त्यानी पजाब करारावर सही करायचं धाडस दाखवून बऱ्याच काळानं पजाबला सुखाचा नि:श्वास टाकायची संधी दिली त्याच दिवशी हे निश्चित ठरल होत की, त्याच्या आत्म्याला सद्गती लाभणार शब्दश: आणि अर्थश:.

प्रसंग खरा की काल्पनिक देव जाणे; पण दिल्लीतल्या एका मातबर पत्रकारान रिपोर्ट केला होता. सलग दोन रात्रदिवस काम झाल्यावर पहाटेच्या सुमाराला पजाब मसुद्यावर सह्या झाल्या. त्यानतर राजीवजी निवातपणे उठले, अगावरचा जोधपुरी कोट काढला आणि आतल बुलेट प्रूफ जॅकेट काढून सत लोगोवालजीना देत म्हटले 'आता मला याची गरज पडणार नाही, तुम्हाला पडेल. राहू द्या तुमच्याजवळ.'

हा प्रसग खरा असेल तर पजाब मसुद्यावरची नेमकी प्रतिक्रिया राजीवजी आणि सत लोगोवाल याच्या लक्षात आली होती असं समजायला हव. बहुसख्य जणांनी पंजाब प्रश्न सुटला असा नि:श्वास टाकला होता. नतर पजाबमध्ये गेलो होतो. तेव्हा लक्षात आल की, हा नि:श्वास एवढा परिपूर्ण असण्याच कारण नाही. शीख युवामनातला हिसक असतोष जागा आहे. आणि करार ही धूळफेक आहे असे अनेक आवाज ऐकू येत होते. भिंद्रानवाले जिवत आहेत आणि मार्ग दाखवण्यासाठी योग्य वेळी प्रकट होणार आहेत अशी मन:पूर्वक श्रद्धा बाळगणाराही एक मोठा वर्ग पजाबमध्ये आहे. भारतीय राजकारणात दहशतवाद हे ओळखीच चिन्ह होऊन रहाणार असं दिसत होत. ललित माकन -याच्या हत्येनं हेच दाखवून दिलं होतं. या पद्धतीनं पजाबमध्ये आणि देशाबाहेर शीख दहशतवाद काम करत राहिल्यास ग्रेट ब्रिटनच्या आयरिश समस्येसारखी ही भारताची एक कायम ठसठसती जखम बनेल की काय अस वाटत होत. या उलट 'साब सबकुछ दे दिया' अस चिडून म्हणणारे हिंदू समूहही दृष्टिपथात दिसत होते. याचा अर्थ अजून बराच गुता शिल्लक होता. काही दिवसानतर सुवर्ण मदिरात अखिल भारतीय शीख विद्यार्थी महासंघ आणि अकाली दल (युवक शाखा) याच्या झालेल्या दंगलीन हेच दाखवून दिल. सर्व मिळून एक निश्चित अर्थ होत होता. सत लोगोवालजीनी जपून असायला हवे.

¤

सत हरचदसिग लोगोवाल. वय वर्षे त्रेपन्न फक्त. शात, धीम मृदु शीख व्यक्तिमत्त्व भिंद्रानवालेंच्या सुराला कायमच असणारी कडवटपणाची, हिंदुद्वेषाची धार सत लोगोवालजीच्या आवाजाला कधीच नव्हती. १९८३ च्या जूनमध्ये ज्ञान प्रबोधिनीची पहिली पजाब सद्भाव यात्रा पजाबमध्ये गेलेली असताना पतियाळात त्यांचा प्रत्यक्ष निरोप मिळाला होता, 'भेटायला या, तुमच मन:पूर्वक स्वागत आहे.' भेटायला गेलो तेव्हा व्यक्तिमत्त्वाच हेच रूप दिसल. अकाली दलाचा सर्वोच्च नेता, आदोलनाचा 'मोर्चा डिक्टेटर'. मुख्यत: १९७७-७८ नतर राजकारणात वर आलेला हा शात नेता पाच-सहा वर्षातच सगळ्या देशाच लक्ष वेधून घेणाऱ्या आंदोलनाचं नेतृत्व करत होता. त्याचे सगळे मुद्दे पटत होते अस नाही; पण चर्चेच्या पद्धतीत एक शान होती. दुसऱ्याचं ऐकून घ्यायची तयारी होती. सत लोगोवालजी हसण विसरले नव्हते. नतर तीन-चार वेळा त्याच्याशी भेट झाली, गप्पा झाल्या. तेव्हा पजाब अधिकाधिक अस्थिर, अशात होत गेला होता. असच एकदा हसत, अगदी पितृतुल्य वात्सल्याने पाठीवर हात ठेवत त्यानी सागितल 'जेव्हा गरज निर्माण होईल तेव्हा या देशाकरता आम्ही मरणार आहोत.'

¤

त्याचा शब्द त्यांनी खरा केला.

¤

शांततेसाठी आसुसलेल्या बदलत्या जनमताचा दबाव, केन्द्र सरकारनं घेतलेली लवचिक भूमिका, ती दर्शविणारे अनेक निर्णय, राजीवजींच्या विदेश दौऱ्यामधून शीख दहशतवादाविरोधी तयार झालेलं जागतिक लोकमत आणि दिल्ली दगली, दिल्ली बॉंबस्फोट, कदाचित 'कनिष्क'-सारख्या भयस्वप्नाचा अर्थ, हे सर्व लक्षात घेऊन संत लोंगोवालजींनी आपली राजकीय भूमिका बेतली. केंद्रसरकारशी चर्चेत पुढाकार घेतला. या चर्चेच्या आड येऊ शकणाऱ्या पक्षांतर्गत घटकाना कौशल्यानं बाजूला सारलं. त्यातून अखेर पंजाब करार घडला. त्यावेळी अकाली राजकारणातल्या हिंसक घटकाचं भान असणाऱ्या संतजींना आपण कोणता धोका पत्करतो आहोत याची जाण असणार; पण तो धोका पत्करून त्यांनी अकाली पक्षाचं सूत्रचालन केलं. सावकाशपणे कराराविरोधी बोलणारे पक्षांतर्गत आवाज विरत गेले. फेब्रु. ८६ मध्ये पंजाबातल्या निवडणुका व्हाव्यात असं लोंगोवालजींचं म्हणणं होतं. सहाजिकच आहे, कारण निवडणुकांना सामोरं जाण्याच्या सुसघटित स्थितीत अकाली पक्षसघटना सध्या नाही. तरीसुद्धा निवडणूक जाहीर झाल्यावर त्याला सामोर जाण्याचा अत्यंत सूज्ञ देशहिताचा निर्णय त्यांनी घेतला. उलट पक्षैक्य घडवून पंजाब करारामागची शक्ती वाढवायला त्यांनी याचा वापर करून घेतला. आता निवडणूक होऊन पंजाबमध्ये रीतसर लोकशाही सरकार काम करू लागलं तर पाच वर्षांपासून पंजाबला ग्रासून राहिलेला एक प्रश्न जवळजवळ सुटला असता. संत लोंगोवालजींची हत्या हा या आशेला वर्मी बसलेला फटका आहे. कोणत्याही व्यक्तीची हत्या ही दु:खद आणि निषेधार्ह घटना असतेच. पण संतजींची हत्या ही केवळ एका व्यक्तीची हत्या नाहीये. तो एका मृदु नेत्याचा, जनतेच्या आशेचा आणि लोकशाहीचा खून करायचा प्रयत्न आहे. म्हणून पंजाबमध्ये रीतसर निवडणूक होणं, दहशतवादाचा जनाधार उध्वस्त होणं आणि पंजाबमधल्या सत्तेत अकालींना वाटा मिळणं ही संत लोंगोवालजींना खरी श्रद्धांजली ठरू शकेल.

त्याच दिवशी जलंधरमध्ये कॉं. (आय) च्या दोन नेत्यांचाही खून झाला. गुरुदयाल सैनी आणि देवदत्त खुल्लर. या दोघानाही आम्ही भेटलो होतो. आपण ज्याना हालताना, बोलताना, जिवंत व्यक्ती म्हणून वावरताना पाहिलं आहे अशाचा निर्घृण मृत्यू अंतःकरण थरारून टाकतो. संत लोंगोवालजींच्या हत्येनं दिलेला फटका—अपेक्षित असूनही—जाणवतो तो यामुळेच. पुण्यातर्फे ज्ञानप्रबोधिनीत त्यांचा सत्कार करायचं ठरलं होतं. ऑक्टोबरमध्ये त्यांनी यायचं कबूल केलं होतं. आता? अकाली दलापाशी पर्यायी नेतृत्व कोणतं आहे? गेला काही काळ प्रकाशसिंग बादल तर जहाल भाषा बोलून राहिलेत मग अकाली दलाच्या नेतृत्वाची सूत्रं जहाल गटाच्या हातात जातील का? यापुढे येणारं नेतृत्व केंद्र सरकारशी तडजोडीचं मवाळ धोरणच पुढे रेटण्याचा धोका पत्करेल का? दहशतीच्या कवचाआड बराच काळ आक्रसून गेलेलं पंजाबी मन आत्ता आत्ता मुक्त होऊ लागलं होतं, ते आता परत आक्रसून जाईल का? अशा अनेक प्रश्नांनी पंजाबचं क्षितिज काळवडून गेलं आहे.

इतिहासातल्या फार थोड्या वळणावर एका व्यक्तीचं असणं किंवा नसणं इतकं अर्थपूर्ण ठरतं. ३१ ऑक्टो. ८४ ला असं एक वळण थबकलं होतं. आता २० ऑगस्ट ८५ ला पुन्हा तेच. आता पुन्हा तेच प्रश्नचिन्ह पंजाबसमोर, पर्यायानं देशासमोर आहे. आपल्या फासात आणखी काय काय वेढून घ्यायचा त्याचा विचार आहे?

—अविनाश भगवंत धर्माधिकारी

शेअर्स । शेअर्स

# मध्यमवर्ग : नव्या मृगजळामागे....

विनायक गोखले

शेअर बाजारात असलेली तेजी हा सध्याचा एक चर्चेचा विषय बनला आहे. सर्व वर्तमानपत्रे व नियतकालिके, जी पूर्वी फक्त या विषयाची 'दखल' घ्यायची, ती सध्या एखाद्या ज्वलंत विषयाला दिल्या जाणाऱ्या महत्त्वाएवढे 'शेअर...' आणि संबंधित घटनांना महत्त्व देत आहेत. इकॉनॉमिक टाइम्स, फायनान्शिअल एक्स्प्रेस, बिझनेस वर्ल्ड आणि तत्सम नियतकालिके केवळ 'चाळण्या' साठी असतात, अशी एकेकाळी कल्पना असणारे आज ती आवडीने वाचू लागले आहेत. असे अनेक आहेत. 'शेअर मार्केट' किंवा तत्सम, जी फक्त शेअर बाजारसंबंधी असणारी नियतकालिके, नियतकालिके कसली, पत्रकेच म्हणायची, हजाराच्या घरात खपताहेत आणि या पत्रकांची संख्या वाढत गेली आहे. काही डझनांच्या घरात! अनेक घरात-कुटुंबात इतके दिवस 'दलाला' मार्फत येणाऱ्या पत्रकाची, नवीन शेअर इश्यूच्या फॉर्म्सची संभावना 'रद्दी' म्हणून केली जायची. तीच मंडळी आजकाल 'ऐनवेळेला फॉर्म्सचे shortage निर्माण झाले तर... म्हणून 'इश्यू'. आधी पधरा-पंधरा दिवस दलालाकडे खेटे घालताना दिसतात. फॉर्म व उद्योगाची माहिती देणारे पत्रक मिळविण्यासाठी!' इतकी वर्षे वेगवेगळ्या उद्योगांची वार्षिक सभा झाली काय किंवा नाही काय, कोणाला त्याचे सोयर-सुतक होते! पण आता 'वार्षिक सभा' ह्या अनेकांचे भविष्य ठरवणाऱ्या असल्याने राजकीय सभांप्रमाणे गाजावाजा करत पार पडतात .. आणि अशी कित्येक उदाहरणे आपल्या डोळ्यांसमोर घडताहेत.. आणि एखादा विषय 'ज्वलंत' आहे असे म्हणण्यास एवढी

उदाहरणे खूप आहेत.

शेअर बाजार, इतके दिवस भारतीय समाजात एका विशिष्ट वर्गापुरता मर्यादित असलेला विषय अनेक जणानी 'बाद' ठरवलेला आज आपल्या मर्यादा तोडून समाजात खोलवर रूजतो आहे– रूजतो कसला? घुसतो आहे! पूर्वीच्या काळी शेअर बाजारात घडणाऱ्या घटनाचे प्रतिसाद उमटत; पण ते सामान्य मध्यमवर्गीयाद्वारे नव्हेत तर वर उल्लेखलेल्या विशिष्ट वर्गापुरते, पण आज हेच प्रतिसाद आपल्याला इतके सहज ऐकायला मिळतात. म्हणजेच हा विषय 'ज्वलत-सामाजिक' बनला आहे असे म्हटले तर काही वावगे ठरणार नाही.

राजीव गाधींचे नवे सरकार अधिकारपदावर आले आणि त्याच सुमारास शेअर बाजारात हालचालीना जोर आला. त्यावेळेला काहीसा निपचित पडलेला 'बाजार' हलू लागला, तो नवीन सरकारच्या बदलत्या धोरणामुळे आणि जसजसे सरकार स्थिर होत गेले तसतसा 'शेअर बाजारातील' 'भाव वाढीचा' वेग वाढू लागला. जुलै महिन्यात या वाढत्या किमतीनी आजवरचा परमोच्च बिंदू गाठला. गेल्या वर्षी शेअर बाजारातील विविध शेअर्सची मिळून 'बाजारातील' किमत होती १० हजार कोटी रुपयांच्या आसपास; पण आजच्या घडीला हीच किमत १५ हजार कोटी रुपये–जणुकाही आकाशालाच भिडली आहे. पाच वर्षापूर्वी शेअर धारकाची सख्या, जी वीस लाखाच्या घरात होती, ती आज वाढत वाढत ७० लाखाच्या आसपास आहे आणि लवकरच हा आकडा १५० लाखाच्या घरात जाईल, असा अदाज आहे. पण सागण्याचा मुद्दा हा की, गेल्या सहा महिन्यात 'शेअरच्या बाजारातील किमतीत' जी प्रचड वाढ झाली आहे, त्यामुळे ७० लाख शेअर धारकाना या अवधीत ५००० कोटी रुपयाचा लाभ झाला आहे असे म्हटले तर, वावगे ठरणार नाही. सहा महिन्यात ७० लाखाना ५००० हजार कोटी रुपये... अनेकाना मुबईच्या दलाल स्ट्रीटवरील 'बॉबे स्टॉक एक्स्चेंज' ची इमारत ही इमारत नसून, 'अलिबाबाची गुहा' वाटत असेल! स्वप्नातसुद्धा दिसणार नाही इतकी मिळकत काही सदर्भात येथील व्यवहारानी अनेकाना करून दिली आहे आणि म्हणूनच अलिबाबाच्या या गुहेकडे सामान्याचा रेटा वाढतो आहे.

सतीश साने एक-T.V. दुरुस्ती आणि तत्सम व्यवसायातला. गेल्या वर्षी सहज म्हणून नवीन इश्युला अर्ज केलेला– तेव्हा मिळालेले ग्लॅक्सोचे शेअर्स– सरकार बदलले– भाव कडाडले– वर्षात ७५० रुपयाच्या भाडवलावर निव्वळ २५०० रुपये कमवले. त्याच्या कुटुबात गेल्या अनेक वर्षात जे वारे शिरू शकले नाही ते आज ह्याच्या डोक्यात भरले आहेत. तो म्हणतो 'गुतवणूक करायची–नवीन शेअर इश्युना आणि परिवर्तनीय कर्जरोख्याच्या इश्युंना– नशीब आजमावयाचे– नवीन इश्यु इतके येतात– प्रिमियमही चांगला मिळतो– बॅकेत पैसे ठेवणे–छे छे: वर्षभर पैसे फिरते ठेवले तर कितीतरी चागले 'थ्रिल' मिळते.'

आर. व्ही. कुलकर्णी – एक निवृत्त सरकारी अधिकारी. पेन्शनर मित्रमडळीत चर्चेचा विषय हाच पण ढाचा जरा वरचा. गुतवणूक नवीन इश्युत नाही. खरेदी थेट बाजारातून. मग त्यासाठी 'इकॉ. टाइम्स– बदलती धोरण' 'नव्याने जाहीर होणाऱ्या सवलती–' 'एखादी टीप'... एखाद्या उद्योगाच्या शेअरच्या हालचाली सबंधित असलेल्या गोष्टी– त्याच त्याच्या मित्रमडळीत गप्पा. एखादा शेअर उचलायचा किंवा खपवायचा–गणित ठरलेलं. एखादा शेअर लाँग-टर्मसाठी, एखादा शॉर्ट टर्मसाठी... बाजारातून उचलत असले तरी सावधपणे. 'आजकाल नवीन इश्युत काही राम राहिला नाहीये. इतके लोक मागणी करतात...मिळण फार मुश्किल झालं आहे. नशिबाचा भाग नव्हे लॉटरीच म्हणा ना. त्यापेक्षा बाजारातून शेअर उचलायचे एक गणित जमून गेले आहे... अर्थात गेल्या अनेक दिवसाचे निरीक्षण हे कारण असेल... पण आपल्या तत्राने वर्षाला ५०-१०० टक्के फायदा होणं अवघड नाही.'

## झटकन पैसा

ही दोनच नव्हेत तर अनेक माणस सध्या अशी आहेत की, जी या व्यवसायातल्या एक एक पायऱ्या वर चढू पाहताहेत. जे पूर्वी बँकेत दीर्घ मुदतीच्या ठेवीत पैसे ठेवत त्याचा कल, अधिक फायदा म्हणून उद्योगांच्या कर्जरोख्यात पैसे ठेवण्यात वाढतो आहे. १९८० मध्ये विविध उद्योगाचे 'कर्जरोखे आणि शेअर' मिळून सुमारे १०० कोटी रुपये भांडवल जनतेतून जमा झाले होते; पण आज रिलायन्स हा एकटा उद्योगसमूह ३०० कोटी रुपयावर कर्जरोखे जनतेत खपवतो. जसे कर्जरोखे घेणाऱ्याच्यात वाढ झाली, तशीच वाढ नवीन इश्युना अर्ज करणाऱ्यात झाली. मध्यमवर्गीय या प्रकाराकडे फार मोठ्या प्रमाणावर खेचला गेला आहे. 'झटकन पैसा' देणारा हा 'सेफ' प्रकार, अर्थात नशिबाच्या साथीने, मध्यमवर्गीयाला फारच पसत पडला आहे. शेअर्सच्या सदर्भात, नवीन इश्यु ज्या पटीत हल्ली 'over' होतात ते पाहता, आपल्याला याचा पडताळा येतो. कायनेटिक-होंडा यानी देऊ केल्याच्या १६० पट मागणी लोकाकडून झाली. कायनेटिक-होंडा नव्हे तर गेल्या काही दिवसात आलेले अनेक– S.K.F., उषा, मारुती, डॅगर फॉस्ट, तामिळनाडू धागा, हिरो होंडा, स्वराज-माझदा...आणि कितीतरी उद्योगाचे नवीन इश्यु प्रचड पटीत 'over' झाले.

गेली अनेक वर्षे 'नवीन इश्यु' या उद्योगापासून दूर असलेला मध्यमवर्गीयातला फार मोठा गट जसा शेअर बाजाराकडे खेचला गेला आहे तसाच, नवीन इश्युना पूर्वीच्या काळी अर्ज करणारा एक गट होता, जो आता या व्यवसायाच्या पिरॅमीडच्या जरा वरच्या टप्प्यावर आहे. हाही गट सध्या बाजारातील खरेदी विक्रीकडे वळल्याचे जाणवत आहे. एक्स बोनस नंतर खरेदी, नवीन उद्योगाचा शेअर बाजारात आल्या आल्या करायची खरेदी, एखाद्या उद्योगाची टिप–मग ती बोनसची–टाईट शेअरची अथवा गतवर्षीच्या कामगिरीविषयी आणि अगदीच गोटातल्या बातम्या म्हणजे– उद्योगाचे 'टेक ओव्हर' किंवा उद्योगाधारेच होणारे 'हेवी बाइंग'– किंवा वित्तीय सस्थाच्या 'खरेदी' सबधीची बातमी, यासारख्या असख्य टिप्स याच्यावर ह्या गटाची खरेदी–विक्री चालते. ह्याच्यात झालेली वाढसुद्धा लक्षणीय आहे. मुबई शेअर बाजार, जेथे भारतीय शेअर व्यवसायातला ६० टक्के व्यवसाय चालतो, तिथल्या रोजच्या व्यवहारात ६ ते ७ पटीनी वाढ झाली आहे आणि ही जी वाढ आहे ती गेल्या सहा महिन्यात.

पाच वर्षांपूर्वी शेअर आणि कर्जरोखे मिळून सुमारे १०० कोटीचे

भाडवल उभे राहिले होते. गेल्यावर्षी हीच रक्कम वाढत वाढत २००० कोटी रुपयावर पोहोचली. म्हणजे भारत सरकारला आयकर-रूपी मिळणाऱ्या रकमेच्यापेक्षा जास्त. यदाच्या वर्षी हीच रक्कम फुगून ३००० कोटी रुपयाचा आकार धारण करेल असा अदाज आहे. ७० लाख शेअर धारक ही सख्या आयकर भरणाऱ्याच्या सख्येच्या तिप्पट आहे. तरी पण भारताच्या लोकसंख्येच्या सुमारे १ टक्काच आहे. या ७० लाख लोकाच्या दिमतीला सुमारे दोन हजार दलाल मुबई शेअर बाजारात दुकान थाटून आहेत. १९८३ मध्ये मुबई शेअर बाजारात नोंदणी झालेल्या उद्योगाच्या सख्येत आज दीड पटीनी वाढ झाली आहे. १९८३ मध्ये सुमारे १५०० उद्योगाची नोदणी होती ती आज सुमारे २३०० च्या घरात आहे ज्याची दर्शनी किंमत ही साधारणत: ६००० कोटीच्या घरात आहे. प्रगतशील राष्ट्राच्या दृष्टीने ही वाढ अर्थात दुर्लक्षणीय आहे.

टोकिओ शेअर बाजारात असलेल्या शेअर्सची बाजारू किमत १९८३मध्ये ६,६०,०००कोटी रुपये होती, जी किंमत आजच्या भारतीय शेअर उद्योगाच्या सबधित किमतीच्या ४४ पट आहे. आणि जपानमधील शेअर उद्योग अमेरिकेतील उद्योगाच्या फारच मागे आहे! वॉलस्ट्रीट–अमेरिकेतील शेअर बाजारात रोजची उलाढाल १००० कोटीची आहे, ज्यापुढे दलाल स्ट्रीटवरील ४० कोटी रुपयाची उलाढाल किरकोळ वाटते. भारतात रोज सुमारे १५० उद्योगाच्या 'शेअर्स' मध्ये उलाढाल होते. हाच आकडा 'वॉल स्ट्रीट' वर १५०० आहे.

## दुपटी–तिपटीने वाढ

भारतासारख्या देशात, जिथे अजूनही पन्नास टक्के लोक दारिद्रय रेषेखाली जगतात, तिथे झालेला हा वरील बदल सुद्धा फार मोठा आहे. भारतात गेल्या तीन वर्षात नवीन असे आठ शेअर बाजार सुरू झाले. अजमेर, अलिगड, हरिद्वार, हृषिकेष, पुणे, लखनौ, आग्रा व चंदीगड. मुबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास व अहमदाबाद ह्या मुख्य व त्याना सलग्न असणाऱ्या इतर शेअर बाजारात जी ही भर पडली आहे ती वाढत्या व्यवहारामुळे मुबई शेअर बाजारातील एका दलालाशी बोलताना वाढते व्यवहार व वाढते भाव यासबंधी त्याने सागितले की, 'पूर्वीच्या काळी शेअरमधील गुतवणूक विशेष फायदेशीर नव्हती पण सध्या या व्यवसायातला फायदा लक्षात घेता व त्याला जोडून वाढणारे व्यवहार लक्षात घेता, हळूहळू मध्यम ते मोठ्या शहरात शेअर बाजार सुरू करावे लागणार असे दिसते.' मुबई शेअर बाजारावर जो भार आहे तो पुण्याला शेअर बाजार सुरू झाल्याने कमी झाला का?...तर त्याचं उत्तर 'झाला. पण लक्षात आला नाही, कारण पुण्याचा शेअर बाजार स्थिरस्थावर होईपर्यंत ही नवी 'बुम' आली आणि त्याचा मुबई बाजारावर ताण एवढा पडला की पुण्याच्या बाजारामुळे कमी झालेला भार जाणवण्या पलीकडे गेला.' वाढत्या भावासबंधी चर्चा करताना त्यानी सागितले की, या वर्षी सर्वसाधारणत: सर्व शेअरचे भाव सहा महिन्यात ५५% नी वाढले आहेत. काहीचे भाव तर दुपटीने किंवा तिपटीने वाढले आहेत.

बजाज अँटो जानेवारीत ८५० च्या घरात होता तो १६५० च्या आसपास आहे. कायनेटिक इंजिनियरिंग १३५ चा ३५० च्या घरात गेला. पुढे त्यांनी म्हटले की, 'नवीन सरकार–परवाने–सवलती–हे सर्व ठीक आहे. तरीपण–एवढी वाढ–नाही बाबा आपल्याला तरी हा अदाज नव्हता.' त्यानी आपले प्रांजळ मत सांगितले.

पुढे ते म्हणाले की, 'गेल्या वर्षी एका इसमाने त्याच्याकडून रिलायन्सचे ५०० कर्जरोखे विकत घेतले, ९२ रुपये भावाने. पुढे त्या उद्योग समूहाने कर्जरोख्याचे शेअरमध्ये परिवर्तन करून दिले त्यामुळे त्या माणसाने केलेल्या ४६००० रुपये गुतवणुकीची आजची किंमत १.५ लाख झाली. आता ज्या इसमाला वर्षात एवढा फायदा झाला तो जर आठवड्यातून किमान दोनदा माझ्याकडे चक्कर मारू लागला तर त्यात नवल ते काय?' अर्थात असा फायदा सर्वांनाच होईल अशातला भाग नाही पण कमी अधिक प्रमाणात असंख्य लोकांनी या 'बुम' मध्ये हात धुवून घेतले आहेत. या दलालाने आपल्या कार्यालयातील नोकराच्या संख्येत झालेली वाढ हीसुद्धा वाढत्या व्यवसायाची खूण असल्याचे जाता जाता सांगितले.

पाच वर्षापूर्वी हिंदुस्थान लिव्हर या उद्योगाचे शेअर–धारक हे सर्वात जास्त होते. ८०००० त्याची सख्या होती. पण सध्या गुजराथ नर्मदा व्हॅली फर्टी.चे शेअर–धारक आहेत ४.२२ लाख तर रिलायन्स उद्योगाचे आहे ३.५८ लाख. याशिवाय लोहिया मशिन्स, ग्वालियर रेयॉन, I. T. C. J. K., अबालाल साराभाई, इंडियन रेयॉन, लिप्टन, ग्लॅक्सो या उद्योगांचे शेअरधारक आहेत लाखाच्यावरती. रिलायन्समध्ये विविध प्रकारची गुतवणूक करणाऱ्याची सख्या ही आयकर भरणाऱ्याच्या निम्मी आहे. तर GNFC च्या शेअरधारकांपैकी २ लाख शेअर–धारक हे व्यवसायाने शेतकरी आहेत. I. D. B. I. ने काढलेल्या पाहणीत असे आढळून आले आहे की, दर आठ शेअर–धारकामागे एकजण हा शेतकरी आहे एकंदरीत या व्यवसायाचा वाढता पसारा बघता सर्वसामान्यापर्यंत पोहोचू शकणारी यंत्रणा निर्माण करायची असेल तर सध्याचे दलाल आणि त्याचे सहकारी याच्या संख्येत तिपटीने फरक होण्याची आवश्यकता आहे

## चढउताराचा फायदा

शेअर बाजार वाढतो आहे भावही वाढताहेत पसाराही वाढतो आहे आता वाढते भाव व वाढता फायदा म्हणून वाढत्या संख्येने गुंतवणूकदार वाढताहेत, का गुतवणूकदार वाढल्यामुळे भाव वाढताहेत? आधी बी? का आधी झाड? ह्यातलाच हा प्रकार आहे. पण सध्याची जी तेजी आहे ती कशाचे प्रतिक आहे हे बघणे आवश्यक ठरेल. शेअर बाजार ही एक सवेदनाशील जागा आहे, भारतीय उद्योगाचे हृदय. मागणी पुरवठा या तत्त्वावर आधारीत किंमती वर–खाली होतात. नवीन सरकारने खाजगी क्षेत्रातील उद्योगाना दिलेल्या सवलती व सढळ प्रोत्साहन यामुळे या क्षेत्रात एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण झाला व त्याचा परिणाम शेअर बाजारात दिसू लागला. १९६९–७० च्या तुलनेत शेअर्सचा अखिल भारतीय मूल्य निर्देशाक ४९४ पर्यंत गेल्याचे आढळले आहे व तो वाढून ५५० पर्यंत जाण्याची शक्यता आहे. पाच महिन्यातील ही वाढ सुमारे २०० गुणाची आहे. गेल्या काही दिवसात ५० गुणाची वाढ झाल्याने मुबईच्या व्यवहाराना ४० टक्के मार्जिन लावले गेले व त्यामुळे मुबईत नोंदणी असलेल्या व्यवहारातील वाढती तेजी कमी झाली. पण इतर ठिकाणी ती चालूच राहिली. नवीन सरकारने

पृष्ठ २० वर

ह्या ना त्या निमित्ताने

# झोपडी की गगनचुंबी ?

फिरोज रानडे

मुंबईत येणारा हा बाहेरच्या लोकांचा लोढा थाबवायलाच पाहिजे त्याशिवाय तरणोपाय नाही.' असं आपल्या बोलण्यात 'तरणोपाय' वगैरे शब्द स्वातंत्र्य सैनिक बर्व्यांशिवाय कोण वापरणार होतं व ते बरोबरच होत. स्वा. सै. बर्व्यांनीच आपल्या बैठकीत हा प्रस्ताव माडला.

बर्व्यांनी हा 'लोंढा' थाबवण्याचा प्रस्ताव माडला व त्याला तेथे हजर असलेल्या सगळ्यानी म्हणजे दोन कर्वे, दोन कामत व एक फलाणे म्हणजे फक्त राधा ह्यानी मुंड्या हलवून समती दिली.

मुबईत येणारा बाहेरच्या लोकाचा लोढा थांबवायला पाहिजे ह्या प्रश्नाच्या वा उत्तराच्या म्हणा पाहिजे तर बऱ्याच खुब्या आहेत.

पहिली खुबी म्हणजे ज्याप्रमाणे 'देशातील गरीबी हटली पाहिजे' वा 'देशात समाजवादी समाजरचना आली पाहिजे' ह्याला जसा कोणाचाही विरोध नसतो तसाच हा 'लोढा' थाबवण्यालाही नसतो.

आणि ज्याप्रमाणे गरिबी हटवायची कुणी ? वा समाजवादी समाजरचना आणायची कुणी ? ह्याबद्दल व्यक्तिनिहाय वेगवेगळी मते असतात त्याचप्रमाणे लोढा थांबवायचा कुणी व कसा ? ह्याबाबतही असल्य मतभेद असतात.

लोढा थाबवण्याबाबतच्या प्रश्नाची दुसरी खुबी म्हणजे लोढा थाबवलाच पाहिजे, त्या शिवाय तरणोपाय नाही, त्याशिवाय गत्यतर नाही, त्याशिवाय हे सगळे एक दिवस कोसळून पडेल वगैरे म्हणणारे सगळे स्वतःच मुबईच्या बाहेरून आलेले असतात. तेसुद्धा असेच एकेकाळी कोठल्यातरी 'लोढ्या'त मुबईत आलेले असतात. त्यांनीही मुबईतली गर्दी वाढवलेली असते, त्यांनीच मुबईचे प्रश्न अगदी पराकोटीला नेण्यात हातभार लावला असतो.

पण एकदा मुबईत आला की माणूस हे सगळं विसरून जातो व मुबईत येणाऱ्याचा लोढा थाबलाच पाहिजे म्हणून हाकाटी करू लागतो. म्हणजे आमच्यानतर येणाऱ्याचा लोंढा थांबवायला हवा होता वा अजूनही थाबवायला पाहिजे असा ह्याचा रोख असतो.

आता बर्व्यांच्या 'मुबईत येणारा लोढा थांबवायला पाहिजे' ह्या प्रश्नाला मुडी हलवून समती देणारे सगळे मुबईच्या बाहेरून आले होते.

बर्वे गुरुजी स्वत. ३६–३७ साली मुबईत आले होते. त्याचे काय झाले होते की, दुसऱ्या महायुद्धाचे आधी तीन–चार वर्षे सगळ्या जगातच फार मोठी मंदीची लाट उसळली होती. उद्योगधंदे वाढत नव्हते, नवीन कारखाने निघत नव्हते, बँकाचे प्रस्थही आजच्या इतके बोकाळले नव्हते. त्यामुळे नोकरी देणारी सस्था म्हणजे फक्त मायबाप सरकारच होते. सरकार तरी देऊन देऊन किती नोकऱ्या देणार होते ?

वाई क्षेत्री रहाणाऱ्या बर्व्यांना वाईला काय पुण्यालाही नोकरी मिळण्याचा सभव नव्हता अगदी चागले पदवीधर असूनसुद्धा. सुदैवाने बर्व्यांचे कोणी लाबचे मामा कलेक्टर कचेरीत होते. त्यानी ओल्ड कस्टम हाऊसमध्ये त्याना टेंपरवारी म्हणून चिकटवून घेतले–ते चिकटले ते चागले ओल्ड होईपर्यंत चिकटूनच राहिले. पूर्वी मुगभाटात रहात असत. आता मुबईच्या पुण्याला म्हणजे विलेपार्ल्याला सोसायटीत ते रहायला आले होते. गेल्या पन्नास वर्षात त्यांच्यात पडलेला हा एकुलता एक फरक.

कर्वे ज्या वर्तमानपत्रात काम करत तेच मुळी मुबईहून प्रसिद्ध होत असे त्यामुळे त्याना मुबईला येणे आवश्यक होतं.

कामत हा कारवारी, त्याचे वडील काही उद्योगधद्याच्या निमित्ताने मुबईला आले होते. बर्व्यांच्या दहा–बारा वर्ष मागे–पुढे. पण तो स्वत ला मुबईचा 'खरा' रहिवासी समजत असे.

श्याम तर काय बोलून–चालून मध्यवर्ती सरकारातला अधिकारी. मध्यवर्ती सरकार त्याला जेथे 'पोस्ट' करेल तेथे जाणे त्याला भाग होते. आता 'मध्यवर्ती' नेच त्याला मुबईला नेमल्यामुळे त्याला मुबईला येण भाग होत ! आता हे शभर टक्के खरं नव्हतं. कारण श्यामने स्वत मुबईला बदली व्हावी म्हणून खटपट केली होती. पण चार लोकात सागताना मात्र तो आपण कर्तव्य निभावण्याकरता मुबईला राहिलो आहोत म्हणून सागत असे व मुबईतल्या येणाऱ्या लोढ्याबद्दल वेगळे विचार माडत असे व त्याच कारणामुळे त्याने बर्व्यांच्या प्रस्तावाला मुडी डोलावली नव्हती.

एकतर सगळ्यानी बर्व्यांच्या म्हणण्याला मुडी डोलावली असती तर वाद पुढे रगला नसता व श्यामचे वरील तऱ्हेचे विचार म्हणून त्याने मुडी तर डोलावली नव्हतीच उलट तो विरोधात जाऊन म्हणाला,

'पण आपण सगळेच जर मुबईच्या बाहेरून आलो आहोत तर आपण नव्याने मुबईत येणाऱ्याना विरोध कसा करू शकतो ?'

श्यामच्या ह्या अनपेक्षित पण रोख–ठोक सवालाने क्षणभरच का चागली दोन–चार क्षण शातता पसरली. प्रत्येकाच्या मनात आपला इतिहास उभा राहिला. आपणही कोणे एके काळी मुबईत बाहेरून आलो होतो हे त्याना प्रखरतेने जाणवलं. श्यामच्या प्रश्नाचं उत्तर देण फार कठीण होतं. पण कठीण काम आहे म्हणून त्यात हात घालायचा नाही हा काही मराठी बाणा नाही.

कर्वे त्या बाण्याला जागून म्हणाले, 'पण त्यावेळी मुबईत गर्दी कमी होती. आता तसं

राहिलं नाही आहे !'

'कोण म्हणतं मुंबईत गर्दी कमी होती म्हणून ?' श्यामने प्रश्न केला. 'मुंबईत गर्दी होते आहे ही हाकाटी किती वर्षांपासून चालली आहे असं वाटतं ?'

'आता नक्की तारीख कशी सांगणार ?'

'नक्की तारीख नका सांगू पण निदान वर्ष, नाहीतर दशक तरी सांगाल की नाही.'

'हे बघा, आता बर्व्यांना पण स्फुरण चढलं. 'साधारणतः ६२–६३ किंवा तुम्ही दशक म्हणताहात तर साधारणपणे १९६० ते ७० च्या दरम्यान मुंबईची गर्दी जाणवायला लागली ! सगळा बकालपणा आला. देशातल्या सगळ्या भागातून माणस येऊ लागली.'.

'तुमचे दशक बरोबर असले तरी शतक चुकले आहे ! अगदी शभर टक्के चुकलं आहे.' श्याम मोठ्या आनंदाने व विजयी स्वराने म्हणाला.

'आता शतक व दशक ह्या शब्दाचे अर्थ सगळ्यांना माहीत होते. पण अर्थ माहीत असणे व अर्थबोध होणे ह्यात फार फरक आहे. कर्वे बाईंच्या तर श्यामचे म्हणणे अगदी डोक्यावरून गेले आणि त्यांनी विचारले,

'ही दशक शतक काय भानगड आहे आणि बर्वे गुरुजी शतकाने चुकले म्हणजे काय ?'

आता श्यामला जास्तच उत्साह आला. त्या उत्साहात तो म्हणाला, 'बर्वे गुरुजींना वाटत त्याप्रमाणे मुंबईत गर्दी वाढते आहे ही हाकाटी १९६० ते १९७० दशकातली म्हणजे ह्या दहा वर्षातली नाही तर ती १८६० ते १८७० ह्या शभराहून जास्त वर्षांपासूनची आहे !'

हे श्यामचे भाषण ऐकून सगळेच चक्रावले काय ? मुंबईत होणाऱ्या गर्दीबद्दलची हाकाटी १००–१२५ वर्षांपासून आहे ना ? अबब.

'आज श्याम काकाचा बंडल मारण्याचा मूड दिसतोय.' तरुण कामत उसळून म्हणाला, खर म्हणजे तो श्यामला असं काही सहजपणे बोलणारातला नव्हे. पण श्यामने जे सांगितले त्याच्यावर विश्वास बसणे फार अवघड होते. बाकीच्याही मनात कामत सारखेच विचार होते. पण कामत तरुण होता त्यामुळे उसळी खाऊन तो पटकन म्हणाला होता एवढेच.

श्यामला ह्या लोकाची अशी प्रतिक्रिया होणार ह्याची कल्पना होतीच. त्यामुळे तो रागावला तर नाहीच उलट जास्तच शांतपणे म्हणाला, 'मी बंडल मारतो आहे असे वाटते ना तुम्हाला ? तर लेखी पुरावाच देतो.'

असे म्हणून त्याने फडताळातले एक जुने पुस्तक काढले व त्यातले एक विशिष्ट पान काढून तो म्हणाला, 'बघा ह्या पुस्तकात काय म्हटल आहे ते... सन १८६३ त नवेंबर महिन्याच्या ग्याझेट वर्तमानपत्रात असे लिहिले आहे की, हल्ली इथे जाग्याचा सर्व प्रकारे संकोच होत आहे, व लोकास दुप्पट–तिप्पट भाडे देवून रहावयास जागा सापडत नाही, सबब सरकारचा असा मनसुबा आहे की, ठाणे जिल्हा जो मुंबई लगत आहे तो तीत मिळवून ठाणे व मुंबई ही एक शहर करावे '

श्यामचे वाचन सगळे शांतपणे ऐकत राहिले.

'आता पुढे बघा.' श्याम परत त्या पुस्तकातला उतारा वाचून दाखवू लागला. 'मुंबईत वस्ती वाढते आहे व जाग्याची जिकडे तिकडे संकोच पडल्यामुळे लोकांत फार अडचण होते... सबब कापाच्या मैदानाच्या पश्चिमेस कुलाब्याच्या आणि वालुकेश्वराच्या मध्ये जी सुमारे एक कोस लांब व दीड कोस रुंद खाडी आहे, तीत भर घालून तेथे नवे बंदर करून लोकांस रहाण्यासाठी जागा वाढवावी, असा कित्येकांचा मनसुबा होता. हे मोठे अचाट कृत्य असून यास पुष्कळ द्रव्य खर्च होईल.'

श्यामचे वाचन संपले. वर तो म्हणाला, 'बघा शभर वर्षांपूर्वी मुंबई-ठाणे एक करावे व आताचा मरीन-ड्राईव्ह बांधावा असा 'मनसुबा' होता. कारण काय तर मुंबईतली वाढणारी गर्दी !

आता सगळेच चूप झाले. 'म्हणजे मुंबईत येणारा लोंढा आजकालचा नाही तर !'

आता कामतला पुस्तकाबद्दल उत्सुकता निर्माण झाली. 'कोणाचे पुस्तक आहे ? कधी प्रसिद्ध झाले आहे ?'

'पुस्तकाचे नाव आहे 'मुंबईचे वर्णन' प्रसिद्ध झाले आहे १८६३ मध्ये ! आणि लेखक आहेत गोविंद नारायण माडगावकर. किती माहिती गोळा केली आहे ह्या माणसाने ! तू जरूर वाच.' श्यामने कामतच्या प्रश्नाला उत्तर तर दिलेच पण त्याच्या हाती पुस्तक पण दिले.

पण अजूनी कर्व्यांचे समाधान झाले नव्हते. ते म्हणाले 'ते सगळे खरे असेल. मुंबईत गर्दी गेल्या शभर वर्षापासून होत असेल पण आताची परिस्थिती वेगळी आहे ! चाळीस लाख लोक झोपडपट्ट्यात रहाताहेत घाण वाढली आहे, रोगराई वाढते आहे ! येणाऱ्या लोकांनी मुंबईत येण्याआधी विचार करायला नको ?' 'आपण लोकांनी केल होता असा विचार मुंबईला येण्याआधी ?' श्यामने प्रतिप्रश्न केला व तो पुढे म्हणाला, 'असा विचार येणारे कधीच करत नाहीत ! आणि मुंबईचे हिंदुस्थानातल्या अगदी आसाम-बंगालपासून ते पंजाब-काश्मिरपर्यंत फार मोठे आकर्षण आहे हे विसरू नका.' पूर्वी चैन-मौजमजा करायची म्हणजे 'जिवाची मुंबई करायची' असा आपल्या मराठीत वाक्-प्रचार होता तो काही उगाच नाही !'

'पण मग मुंबईचा प्रश्न कधीच सुटणार नाही असं म्हणायच आहे तुम्हाला ?' कर्वे मोठ्या असाह्यतेने म्हणाले.

'न सुटायला काय झाले ?' परत तरुण कामत उसळून म्हणाला, 'ह्या बाहेरच्या लोकाचे लोंढे थांबवले पाहिजेत !'

'पण कसे ?' शांतपणे श्याम.

'प्रथम ह्या जुग्गी-झोपड्या उठवायला पाहिजेत !' कामतचे तडक उत्तर.

'पण झोपड्या का म्हणून हटवायच्या ?' परत श्यामने शांतपणे विचारले.

'तुमचे आपले सगळे विचित्रच असते.' आता राधाला अगदी राहवले नाही. 'अहो, झोपड्या आत्ता-आत्ता आल्या आहेत. त्या असल्या म्हणजे घाण वाढते, बकाली वाढते, म्हणून ह्या आत्ता आत्ता झालेल्या झोपड्या काढायच्या समजलात ?'

'मी समजलो पण तुम्ही समजला नाही आहात' श्याम म्हणाला, 'मुंबईची सुरुवातच मुळी झोपड्यांपासून झाली. येथे कोळी, भंडारी व पाचकळशी रहायचे. त्यांच्या झोपड्या होत्या वा कौलं असलेली घरं होती ! मुंबईची वाट लागली ती ह्या तुमच्या गगनचुंबी इमारती आल्यापासून ! त्या आल्या काळ्या पैश्यावर, त्यामुळे काळा पैसा वाढवणाऱ्या गोष्टी पण आल्या.'

'मग तुमचे म्हणणे काय आहे की ह्या गगनचुंबी इमारतींना बंदी घालावी ?' कोणी तरी उत्सुकतेने विचारले.

'अर्थातच !' श्यामने ठामपणे म्हटले, 'आता हे भारताची घटना वगैरे बदलण्याचे म्हणताहेत पण ते अशक्य आहे. नगरपालिका आता आपल्या लोकाच्या हाती आली आहे नगरपालिकेच्या हाती आहे, गगनचुंबी इमारतींना बंदी घालणं ! सगळे बिल्डर्स वगैरे ठिकाणावर येतील !'

'पण हा उपाय जास्तच जहाल नाही का ?' कर्व्यांनी विचारले.

'जहाल उपायाशिवाय मुंबईचा प्रश्न सुटणे नाही !' श्यामने निर्णय दिला. □

# प्रायोजितांचं प्रयोजन ?

सौ. सुधा सोमण

संध्याकाळ व्हायला लागली कीच वेध लागायला लागतात. जवळ जवळ रोजच. रविवारी तर बघायलाच नको. सकाळपासूनच पार रात्रीपर्यंतचे वेध, मधे एक दोन चार तास मोकळे, तेवढेच. काम धामं लौकर आटपायची. घरी भेटायला कुणी न आलं तर बरं. ज्यांच्या ज्यांच्या घरी टी. व्ही. आहे, अशापैकी बहुसख्याची स्थिती, १७ मार्चपासून अशीच झाली आहे. पूर्वीसुद्धा हे वेध लागतच होते, पण आताच्या मानानी कमी. येस मिनिस्टर, लुसी, हमलोग, ये जो है जिंदगी, डिफरन्ट स्ट्रोकसच्या वेळेला. पण आता मात्र थोडीशी धावपळच होत आहे. कारण आता तर पेव फुटल्यासारख झाल आहे या कार्यक्रमाचं. नित्य नवीन प्रायोजित कार्यक्रम. देशी, विदेशी प्रायोजक नवे, कार्यक्रम नवे, आकर्षण नवी. लहान मुलं, मोठी माणसं, बायका, पुरुष, तरुण, वृद्ध, नोकर, मालक, सगळ्याच एकच ध्यान. प्रायोजित कार्यक्रम. बोलण्यातले विषयही तेच. इधर ऊधर, शफी इनामदार, खानदान. हिनी हे केलं, त्याच ते बरोबर नव्हतं. अशी सगळी प्रेक्षक मडळी एकदर सध्या भारून गेल्यासारखी झाली आहेत. नवीन नवीन प्रायोजक, नवीन नवीन कार्यक्रम घेऊन येतातच आहेत

प्रायोजित कार्यक्रमाची ही एवढी मोठी मोहिनी, महत्त्व, आज प्रेक्षकाना, प्रायोजकांना आणि दूरदर्शनाला का वाटते ? जाहिरात आणि पैसा ही जरी या मागची मूळ प्रेरणा असली, तरी या प्रेरणेइतकच मर्यादित या माध्यमाचं महत्त्व राहिलेल नाही, हेही तितकंच खरं आहे. नुसती चित्रं, किंवा नुसते शब्द यापेक्षा हे दृक्‌श्राव्य माध्यम, परिणामाच्या दृष्टीन केव्हाही अधिक सामर्थ्यशाली आहे. समाजातल्या कोणत्याही थरातल्या कोणत्याही व्यक्तीवर ते जलद प्रभावीपणे परिणाम करू शकतं. इतकच नव्हे, तर हा परिणामही सहज, त्या व्यक्तीच्या नकळत घरबसल्या साधता येतो. ऐकलेले शब्द पुष्कळदा विरून जातात. पाहिलेली चित्रं तितकी मनाशी संवाद साधू शकतातच अस नाही. पण ही हालती बोलती माणसं, त्याचं वागणं, त्याचे हावभाव नकळत मनात घर करून रहातात. या माध्यमाची सर्वात मोठी शक्ती हीच आहे

गेली २५ वर्षं आपण भारतात दूरदर्शन पहात असलो, तरी या शक्तीची जाणीव ठळकपणे अशी आपल्याला अलीकडेच काही वर्षात व्हायला लागली आहे अस दिसतं. आजचे बहुसख्य, बहुविध प्रायोजित कार्यक्रम म्हणजे या जाणिवेचाच एक प्रमुख आविष्कार आहे अस म्हणायला हरकत नाही. श्री. वसत साठे माहिती आणि प्रसारण मत्री होते, तेव्हा या शक्तीच्या प्रभावाची जाणीव मनात ठेवूनच, व्यावसायिकाच्या प्रतिभेचा दूरदर्शनसाठी उपयोग करून घेण्याची योजना त्यानी आखली, आणि त्या दिशेने थोडे फार प्रयत्नही सुरू केले. आजचे प्रायोजित कार्यक्रम हा याच सहकार्याचा एक भाग आहे.

### मॉडेला–गझल

दूरदर्शनवरचा पहिला प्रायोजित कार्यक्रम म्हणजे १९८३ साली सादर झालेला मॉडेलाचा गझलचा कार्यक्रम. हा कार्यक्रम बाहेरच्या निर्मात्यांनी सादर केला हे जसं त्याच निराळेपण, तसंच त्या सादर करण्याच्या पद्धतीतही एक प्रकारचा वेगळेपणा होता. इथे नेहमीप्रमाणे दूरदर्शनच्या एका बैठकीवर गझल पेश केली न जाता, चित्रपटाप्रमाणे, भावार्थानुसार गझलच्या पार्श्वभूमीवर निसर्गदृश्यही चित्रित होत होती. मॉडेलाचा हा कार्यक्रम होण्यापूर्वी टोपॅझ, एस. कुमार वगैरे प्रायोजक, चित्रहार रविवारचा चित्रपट प्रायोजित करत असत पण ते खऱ्या अर्थाने प्रायोजित कार्यक्रम नव्हते. कारण गाण्याची किंवा चित्रपटांची निवड, मांडणी हे काहीच त्यांच्या हातात नसत. जाहिरातीला एरवी जो खर्च आला असता, त्यापेक्षा थोडे जास्त पैसे दूरदर्शनला हे प्रायोजक देतात म्हणून त्यानी प्रायोजित केलेला हा कार्यक्रम अस म्हणायचं. ८३ नंतर मात्र बाहेरचे निर्माते, प्रायोजक आणून त्यानी तयार केलेले कार्यक्रम जाहिरातीसाठी सादर करायचे ही कल्पना रूजू लागली आणि मग 'हम लोग' 'ये जो है जिंदगी' असे कार्यक्रम सुरू झाले. आज १७ मार्चपासून तर या कार्यक्रमाचं फार मोठ जाळच दूरदर्शनवर विणल जाऊ लागल आहे आणि नाविन्याच्या या अचानक आणि मोठ्या प्रमाणावरच्या आगमनानं सामान्य प्रेक्षक या जाळ्यात गुरफटला, ओढला जाऊ लागला आहे.

प्रायोजित कार्यक्रमाची ही योजना राबवायच दूरदर्शनने ठरवल्यापासन अनेक प्रायोजक आपापले कार्यक्रम सादर करू लागले आहेत. कार्यक्रमाची ही साखळी सर्वसाधारणपणे उत्पादकापासून सुरू होते. एकदा कार्यक्रम सादर करायचा म्हटलं की, प्रायोजक त्याच्या जाहिरात कपनीच्या मार्फत निर्मात्याशी सपर्क साधतात. जाहिरातदार–निर्माते कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करून प्रायोजकाची समती घेतात आणि मग या कार्यक्रमाचा एक हप्ता किंवा भाग Pilot run म्हणून सकल्पनेसहित दिल्लीला, दूरदर्शनच्या समितीपुढे चाचणीसाठी ठेवण्यात येतो. या तीन जणाच्या समितीने कार्यक्रमाच्या नमुन्याला मान्यता दिली, म्हणजे मग तो पुढे प्रक्षेपणासाठी मजूर होतो. कधी कधी जाहिरातदार–निर्माते एकत्र येऊन कार्यक्रम तयार करतात, तो मजूर करून घेतात आणि मग त्यासाठी प्रायोजक मिळवतात. संमत झालेल्या कार्यक्रमाबद्दल काहीही शका, अडचण उपस्थित झाली तरी त्याच निराकरण दिल्लीला जाऊनच, या तज्ज्ञाच्याकडूनच करावं लागतं.

दर आठवड्याचा एक कार्यक्रम सादर करायचा, म्हणजे प्रायोजकाला १। ते १।। लाख खर्च येतो. त्यात १ लाख कार्यक्रमाच्या निर्मितीसाठी आणि ३५००० दूरदर्शनला द्यावे लागतात. निर्मिती भव्य, अधिक खर्चाची असली, तर निर्मितीचा खर्च अर्थातच आणखी

वाढतो. सर्वसाधारणपणे प्रत्येक मालिकेत १३ कार्यक्रम असतात. कधी कधी जास्त. मग प्रश्न असा येतो, की प्रत्येक कार्यक्रमाचे १॥ लाख, म्हणजे १३ कार्यक्रमाचे जवळ जवळ २० ते २५ लाख रुपये खर्च करून प्रायोजक, या कार्यक्रमांद्वारे आपली जाहिरात का करतात. याचं एक कारण, मघाशी म्हटल्याप्रमाणे लोकावर परिणाम करण्याच दूरदर्शन हे सर्वात प्रभावी साधन आहे हे तर झालच; पण आणखीही एक महत्वाची गोष्ट म्हणजे ही जाहिरात समाजातल्या सर्व थरातल्या, वयाच्या, प्रातातल्या लोकापर्यंत एकाचवेळी पोचू शकते. मग तो प्रेक्षक शिकलेला असो नसो, त्याला वाचता येत असो नसो. दूरदर्शनच्या प्रेक्षकाचा निश्चित आकडा आज उपलब्ध नसला तरी भारतात आज जवळ जवळ ३० लाख TV सेटस् बाळगणारे लोक आहेत. म्हणजे २० ते २५ टक्के लोक टी. व्ही. पहात असावेत असं समजायला हरकत नाही. कोणत्याही मान्यवर पत्रांत जाहिरात दिली, तरी इतक्या लोकापर्यंत ती एकदम पोचणं कठीण आहे शिवाय वर्तमानपत्र म्हणजे वाचायला येण आलच. आज खेड्यातच सामूहिक केंद्रातल्या TV सेटस् वर, शक्तिशाली ट्रान्समिटरवरचे राष्ट्रीय प्रमाणातले कार्यक्रम दिसण्याची सोय सरकारनी केलीच आहे. मुख्य दूरदर्शन केंद्र धरून आज अशी १८७ प्रक्षेपण केंद्र आहेत. त्यामुळे, जरी खर्चिक असला, तरी परिणामी, वर्तमानपत्रांतल्या जाहिरातीपेक्षा, उत्पादकाना हा दूरदर्शनाचा मार्ग अधिक स्वस्त आणि अधिक फायद्याचा ठरतो. शिवाय या कार्यक्रमाच्या निमित्तानं एकचित्त प्रेक्षकवर्ग मिळतो. त्याचाही फायदा होतो. म्हणून आज, अधिकाधिक उत्पादक या प्रायोजित कार्यक्रमाकडे वळताहेत. काही वेळेला एकाच कार्यक्रमाचे दोन प्रायोजक असतात त्यामुळे खर्च वाटला जातो; पण परिणाम तोच साधला जातो.

परदेशी कार्यक्रम प्रायोजित करायचे असले तर १ लाख १० हजार दूरदर्शनला कार्यक्रम दाखवण्यासाठी द्यावे लागतात आणि २० ते २५ हजार कार्यक्रम घेण्यासाठी म्हणजे हक्क वगैरे खर्च करावे लागतात. म्हणजे हा खर्च जवळजवळ देशी कार्यक्रमाच्या प्रायोजिकतेइतकाच होतो, पण सरकार अशा परदेशी कार्यक्रमाना उत्तेजन द्यायला फारसे उत्सुक नाही.

कार्यक्रमाच्या निवडीबद्दल काही उत्पादक एक वेगळं धोरण बाळगतात. बहुसख्य प्रायोजक, सर्वसाधारण प्रेक्षकासाठीच कार्यक्रम देत असतात; परंतु काही उत्पादक मात्र, त्याची उत्पादनं वापरणारा प्रेक्षकवर्ग ध्यानी घेऊनच, त्याच्याचसाठी कार्यक्रम सादर करतात. मग हा प्रेक्षकवर्ग एकूण प्रेक्षकांच्या २० च टक्के असला तरी चालेल. कारण त्याचं म्हणणं असं, की ही प्रेक्षकाची संख्या जरी २० च टक्के असली, तरी या वीसात ८० टक्के आमचे ग्राहक आहेत. तेव्हा ज्या लोकाची माझी उत्पादनं वापरण्याची क्षमता नाही, पण केवळ ज्याची संख्या जास्त आहे, अशा लोकांचा मी कार्यक्रमाच्या निर्मितीसाठी कशाला विचार करू ? याच हिशेबानं मग काही मातब्बर उत्पादक विम्बलडनच्या मॅचेस, क्रिकेटच्या १ दिवसाच्या मॅचेस, ऑस्करचा पारितोषिक वितरण समारंभ, झुबिन मेहताचा ऑर्केस्ट्रा असे उच्चभ्रू पण अतिशय सुदर, दर्जेदार कार्यक्रम सादर करतात.

मर्यादित, विशिष्ट प्रांतांपुरत्याच प्रसिद्धीसाठी प्रादेशिक भाषेतले कार्यक्रमही प्रायोजित केले जातात; पण त्याची मंजुरीही दिल्लीवरूनच यावी लागते.... कोणत्याही प्रायोजित कार्यक्रमाचा, काही अंशी खर्च, कार्यक्रमाला दिल्या गेलेल्या पहाण्याच्या वेळेवर अवलबून असतो Supe A. B. असे त्याचे प्रकार आहेत.

काही उत्पादकाच्या बाबतीत, दूरदर्शनवर कार्यक्रम प्रायोजित करण म्हणजे उत्पादक म्हणून तुमची प्रतिमा उंचावणं असं आहे. एकाच वेळी देशभरच्या सर्व ग्राहकापर्यंत पोचण हे तर झालंच, पण कार्यक्रमाची प्रायोजिकता हा उत्पादकाच्या प्रतिष्ठेचाही थोडासा भाग होऊ पहातो आहे.

## चित्रपटांची नक्कल

आता यानतर असा प्रश्न येतो, की या खर्चात हे प्रायोजक आणि निर्माते आपल्याला कशा तऱ्हेचे कार्यक्रम देतात ? खरं सागायचं तर, खानदान, ये जो है जिंदगी किंवा Quiz प्रोग्रॅम सारखे कार्यक्रम सोडले, तर बहुतेक कार्यक्रम चित्रपटाची नक्कल करणारे असतात असं वाटतं. ओढून ताणून आणलेले विनोद, हलकी फुलकी करमणूक, याशिवाय ज्याला प्रतिभा म्हणून म्हणता येईल अशी निर्मिती कुठे फारशी दिसतच नाही. चित्रपटातले नामवंत, चित्रपटाच्या आसपास असणारे पण फारसे नामवत नाहीत आणि एकेकाळी चित्रपटांत गाजलेले पण आता मागे पडलेले असे सर्व साधारण चित्रपटाशी सबधित कलाकार यात आपल्याला नव्याने पहायला मिळतात म्हणून आपणही जरा खूष असतो; पण एवढा खर्च आणि वेळ घालवल्यानतर, मनाला समाधान देणारं अस काही हाती आल का असा प्रश्न स्वत ला केला, तर त्याचं फार निराशाजनक उत्तर हाती येते. दूरदर्शनजवळ पैसा नाही, म्हणून त्यांना आपल्या कार्यक्रमात उत्तम लेखक, कलावत, तज्ञ आणता येत नाहीत; पण आज प्रायोजकांचा एवढा मोठा पैसा उपलब्ध होऊनही खरेखुरे प्रतिभाशाली कार्यक्रम आपल्यासमोर कितीसे येतात ? उलट इथेही नाव मोठ लक्षण खोटं या धर्तीवर सवंग करमणूक असलेल्या, वास्तवाचा फारसा विचार न करणाऱ्या, स्वप्नरजनात्मक कार्यक्रमाचीच निर्मिती झालेली दिसते. काहीतरी भीती निर्माण करणारा 'सस्पेन्स' ही तर आजची फॅशन झालीच आहे, पण काही वेळा तर, लहान थोर सारेच एकावेळी हे कार्यक्रम पहात असतात, तेव्हा हिंसाचारासारखे विषय टाळणं, समाज हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे, हे भानही ठेवलेलं दिसत नाही. वास्तविक आज एवढा पैसा आणि प्रतिभा हाताशी असताना निर्मात्यानी थोडीशी निष्ठा आणि सामाजिक विचार बाळगला, तर करमणूकसुद्धा कितीतरी वेगळ्या पातळीवरची, दर्जाची देता येईल. मनात आणलं तर किती अपार विषय पडले आहेत. अभिजात साहित्य आहे, विज्ञान आहे, फुलं, वन्यजीवन, ग्रह, तारे, सारं विश्व उभ आहे आपल्या समोर तऱ्हेतऱ्हेचे विषय घेऊन; परतु प्रत्यक्षात मात्र लोकाना आवडते तशी सवग, सामाजिक करमणूक एवढाच विषय दिसतो.

स्वतः उत्पादक या कार्यक्रमाच्या दर्जाबद्दल फारसे जागरूक नसतात आणि त्यांचे सल्लागार जाहिरातदारही त्यांना तशी या कार्यक्रमाकडे पहाण्याची डोळस दृष्टी देताहेत असं वाटत नाही. लोकांना आवडणारा माल-

मसाला, नटनट्या, दृश्य घेतली की झालं. कार्यक्रमाच्या गाभ्याबद्दल आणि गाभ्याच्या परिणामाबद्दल फारसा कुणाला गभीर विचार करावासा वाटत नाही. उगीच लोकांना न आवडणारं काही देऊन त्यांची नाराजी कशाला पत्करा हीच वृत्ती आता तरी दिसते आहे.

प्रायोजक आणि निर्माते यांच्या प्रमाणेच आतापर्यंत जे कार्यक्रम सादर केले गेले, त्याच्या निवडीबाबत दिल्लीच्या तज्ज्ञांच्या समितीनंही फारसा चोखदळपणा दाखवला आहे अस जाणवत नाही. सामाजिक सदर्भ, लोकशिक्षणाची जाणीव या कार्यक्रमात असते असं हे तज्ञ म्हणतात. पण कार्यक्रम पाहून तसं वाटत नाही हे निश्चित.

तात्रिक दृष्टयाही, दूरदर्शनच्या नेहमीच्या कार्यक्रमापेक्षा हे प्रायोजित कार्यक्रम थोडेसे वरच्या दर्जाचे असावेत असे वाटते. पण त्यातही एकमत नाही. कारण बरेचसे निर्माते चित्रपटांतून आल्यामुळे, दूरदर्शनचं तंत्र त्याना नवीन आहे. म्हणूनच, काहीजण चित्रपटासारखंच एखाद्या प्रसंगाच चित्रण shot by shot करतात. तेच दूरदर्शनच्या माध्यमाची जाण असणारा निर्माता, तेच चित्रण एकाच वेळी तीन कॅमेरे लावून, त्याच दृश्याचं सलग चित्रण करतो आणि वेळ आणि खर्च वाचवतो.

### माध्यमाचे वैशिष्टय

या सर्व निर्मितीबद्दल काही अपवाद वगळता, आणखी एक अशी गोष्ट जाणवते म्हणजे, की हे करमणूकीचे कार्यक्रम दूरदर्शनचे कार्यक्रम असे वाटतच नाहीत. प्रत्येक माध्यमाचं स्वतःच असं काही सामर्थ्य आणि स्वतःच्या अशा काही मर्यादा असतात. त्या माध्यमातून होणाऱ्या निर्मितीला त्यामुळेच स्वत.च अस काही स्वतत्र व्यक्तित्व असतं, स्वत चं असं काही वैशिष्टय असत. असं स्वतंत्र वैशिष्टय या कार्यक्रमात कुठे काही दिसतच नाही. चित्रपट आणि नाटक यांचं काहीतरी न मिसळलेलं मिश्रण असे हे कार्यक्रम वाटतात. त्यात चित्रपटाचा सलगपणाही नाही किंवा नाटकाचा एकसंधीपणाही नाही. दूरदर्शनच्या कार्यक्रमात सहितेला फार महत्व असत. ती सहिता सादर करताना ती फार रेंगाळताही कामा नये किंवा फार भराभराही पुढे जाता कामा नये. चित्रपटगृहात लोक तीन तास एक चित्रपट पहात असतात. त्यामुळे मधे इकडे तिकडे त्याच लक्ष गेलं तरी चित्रपटाचा रसास्वाद घेण्यात फारसा फरक पडत नाही इथे इकडे तिकडे लक्ष गेलं की, रसास्वाद कमी होतो. ते लक्ष इकडे तिकडे जाऊ नये म्हणून प्रेक्षकाना खिळवून तर ठेवलेच पाहिजे पण नियोजित वेळात कार्यक्रमाची ओढ आणि गती याची लयही बरोबर साधता आणि साधता आली पाहिजे. अस हे मोठं कौशल्याचं काम आहे आणि याचवेळी हे सर्व तत्रज्ञानाशीही सुसगत पाहिजे नाहीतर आधी ओठ हालताहेत मागून आवाज फुटतोय, चित्रण बरोबर नाही, संभाषणच ऐकू येत नाही, आवाज एकमेकात मिसळून काही चमत्कारीक गोंधळ होतोय. हे सर्व लक्षात घेता, पुष्कळच कार्यक्रमांची निर्मिती इतकी सहज, सफाईदार आणि परिणामकारक होते आहे असं वाटत नाही. म्हणजे थोडक्यात, एवढा पैसा, एवढी कला उपलब्ध असताना सुद्धा दुय्यम दर्जाचे कार्यक्रमच पुरेशा परिश्रमाअभावी आमच्यासमोर प्रायोजित कार्यक्रम म्हणून येत आहेत. काही जणाच्या मते BBC चे सुद्धा सर्वात लोकप्रिय असलेले कार्यक्रम दुय्यम दर्जाचेच असतात आणि अभिरूचीसपन्न कार्यक्रम फार कमी प्रेक्षक पहातात. पण म्हणून आपणही तसच कराव असं नाही. आपल्या निकृष्ट कार्यक्रमांचे हे काही समर्थन नव्हे.

प्रश्न असा आहे, की प्रायोजित कार्यक्रमही जर कनिष्ठ दर्जाचे असले, तर मग आज प्रेक्षक या कार्यक्रमामुळे इतके हुरळून गेल्यासारखे का झाले आहेत ? बहुतेक जण आज असं म्हणताना ऐकू येत, बरं झालं बुवा हे प्रायोजित कार्यक्रम सुरू झाले ते. टी व्ही. निदान बघावासा तरी वाटतो. नाहीतर कसले आपले कार्यक्रम ?' प्रेक्षकांना आज प्रायोजित कार्यक्रमातली पहिली कोणती गोष्ट मोहवत असेल तर ती म्हणजे यातली चित्रपटसादृश्य हलकी फुलकी करमणूक, नटनटयांचे चेहरे आणि नवीन नवीन दृश्य. दूरदर्शनच्या त्याच त्याच खोल्या, त्याच कमानी, त्याच बैठकी पाहून कटाळलेल्या प्रेक्षकाला नवीन नवीन दृश्य, नेपथ्य पाहून सुखावल्यासारखं होत आहे दूरदर्शनच्या नेहमीच्या रटाळ कार्यक्रमापेक्षा घटकाभर करमणूक मिळाल्याचा आनंद, दिवसभराच्या कामान थकलेल्या प्रेक्षकाला आज वाटतो आहे आणि म्हणून या कार्यक्रमातले दोष त्याच्या आतातरी लक्षात येत नाहीत. चागले सुशिक्षित प्रेक्षकसुद्धा या कार्यक्रमानी भारावून गेल्यासारखे झाले आहेत. अचानक नवीन आकर्षक, विपुल आणि बुद्धीला ताण न द्यावे लागणार असं काही या कार्यक्रमामुळे हाती आल्यान निदान आजतरी सर्वसाधारणपणे कोणीच कार्यक्रमाच्या गुणवत्तेचा विचार करायला तयार दिसत नाही.

अर्थात नियमाला अपवाद त्याप्रमाणे १-२ टक्के प्रेक्षक कार्यक्रमाच्या कनिष्ठ दर्जाबद्दल नाराज आहेत. नाही अस नाही. आणि ज्ञान आणि मनोरजन याची कौशल्यपूर्णतेनं सागड घालून विविध तऱ्हेचे कल्पक कार्यक्रम प्रायोजकानी द्यायला पाहिजेत असा त्याचा आग्रह आहे. कारण दूरदर्शनच सुद्धा एक व्यसन आहे ते नकळत आपल्याला जडत. एकदा एक कार्यक्रम पहायला आपण बसलो की तो आवडला नाही आवडला तरी आपण तो कार्यक्रम, त्याच्या पुढचा कार्यक्रम बघतच बसतो. एकदा दूरदर्शनजवळ बसल की खिळल्यासारखच होऊन जातं. पण इतके तास या Idiot box जवळ घालवल्यावर शेवटी आपल्या हातात काय आल असा विचार केला, तर त्याचं उत्तर काय येत याचाही थोडा विचार हवाच. प्रत्येक वेळी दूरदर्शननी लाब चेहरा करून, हातात पुस्तक घेऊन गंभीर काहीतरी शिकवत रहाव असं कुणाचंच म्हणण नाही. करमणूक सर्वांनाच आवडते आणि हवी असते. पण ही करमणूकही निर्मळ, चांगल्या दर्जाची हवी; आणि करमणुकीबरोबरच हळूहळू प्रेक्षकाच्या जाणीवा प्रगल्भ करणारे, असे काही सस्कारही त्या कार्यक्रमात असायला हवेत. लोकाना आवडत ते द्यायचं हे काही अंशी जरी खरं असल तरी जबाबदार माध्यमानी नुसतच लोकाना हवं असलेल देत सुटण योग्य होणार नाही. साहित्य, नाटक, चित्रपट, सगीत, या माध्यमातून जसा एक गट लोकाना हव ते देतोय; पण त्याचवेळी दुसरा एक गट जाणीवपूर्वक, प्रगल्भ अशी कला निर्माण करतो आहे, आणि ही कला रूचणारे, त्या गुणाचा आग्रह धरणारे कितीतरी वाचक, प्रेक्षक आपल्याकडे आहेत. तसच दूरदर्शनच्या

या कार्यक्रमाचही व्हायला हवं. लोकांना आवडणारं थोडं देता देता, या माध्यमाशी प्रामाणिक राहून, प्रेक्षकांवर सस्कार करत अर्थपूर्ण, दर्जेदार निर्मितीही होत रहायला हवी. आणि दूरदर्शनचाही प्रेक्षक हळूहळू तयार व्हायला हवा.

## अनास्था, बेफिकीरी

दुर्दैवान, दूरदर्शननीच आजपर्यंत कधी कार्यक्रमाबद्दलची ही परिपक्व जाणीव आपल्या प्रेक्षकात निर्माण करण्याचा प्रयत्न केला नाही. २५ वर्षं झाली तरी ज्ञान आणि मनोरजन यांची कौशल्यपूर्ण सांगड घालून हळुवारपणे लोकाची मनं जिकून, प्रेक्षकाच्या मनात आपली चांगली प्रतिमा निर्माण करण्यात दूरदर्शन अयशस्वी ठरलं आहे. २५ वर्षात दूरदर्शनने स्वतःच्या अशा चांगल्या कार्यक्रमाच्या, सुजाणतेच्या किती परंपरा निर्माण केल्या आहेत ? दूरदर्शनचे असे लेखक, कलाकार किती निर्माण केले आहेत? कमलेश्वराच्या ' परिक्रमा 'ची अजूनही आठवण होते. पण असे किती जागरूक आणि आकर्षक कार्यक्रम ? दूरदर्शनवर आजही मान्यवर लेखक, कलावत हेच दिसतात. पण नवीन प्रतिभेचा शोध, दूरदर्शनच्या माध्यमासाठी त्यांना घडवणं अस किनी दिसतं ? दिलीप प्रभावळकरसारखे दूरदर्शनने निर्माण केलेले कलाकार कितीसे आहेत ? तेच तेच चेहरे, तिच तिच नावं, आणि तिच ठराविक साचाची निर्मिती. काही अपवाद सोडले, तर प्रेक्षकाबद्दलच्या एक प्रकारच्या बेफिकिरीतच दूरदर्शनन आतापर्यंतची आपली वर्षं घालवली. आम्हाला कुणीही प्रतिस्पर्धी नाही, आणि आम्ही देऊ ते पाहण्याशिवाय टी. व्ही. धारकाना पर्याय नाही. अशा एक प्रकारच्या गर्वातच दूरदर्शन आतापर्यंत राहल्यामुळे प्रायोजित कार्यक्रमाच्याद्वारे जरी दुय्यम कार्यक्रम मिळाले, तरी निदान आमच्या करमणुकीसाठी कुणीतरी काहीतरी करतय, कुणीतरी आमचा विचार करतंय, या भावनेनीच प्रेक्षक सुखावले आहेत. आणि त्यानी प्रायोजित कार्यक्रमाच्या या लाटेला उचलून धरलं आहे.

दूरदर्शनने प्रेक्षकांबद्दलच्या या अनास्थेबरोबरच आणखीही एक गोष्ट केली. यात अर्थात आपली पत्रकारिताही साथ देते आहे. पण आम्ही आकाशवाणीचा जसा श्रोता आजपर्यंत निर्माण करू शकलो नाही तसाच दूरदर्शनचाही, माध्यमाची जाण ठेवणारा सुजाण प्रेक्षकही निर्माण करू शकलो नाही. दूरदर्शनच्या कार्यक्रमाचं मर्म काय, ते कार्यक्रम कसे सादर करायचे असतात, कसे पहायचे असतात याचं प्राथमिक शिक्षणही आम्ही आमच्या प्रेक्षकाना कधी दिलं नाही. आमच्या वर्तमानपत्रातही आधी दूरदर्शनवर फारस काही विचारपूर्वक लिहिलेलं नसतंच, पण जी काही तथाकथित परिक्षण येतात, त्यातही माध्यमाची जाण अशी कितीशी असते ? परीक्षण असत ते बहुताशी आशयाबद्दलचं. हे परीक्षण अशा तऱ्हेने काय कुठल्याही कार्यक्रमाचं लिहील जाऊ शकतं. एखाद्या हॉलमधल्या चर्चेचं, भाषणाचं. पण ज्या माध्यमातून हा आशय व्यक्त होतो, त्या माध्यमाचीही दखल कुठेतरी या आशयाच मूल्यमापन करताना घ्यायला नको का? भाषा आहे, दृश्य आहेत, कॅमेऱ्याने केलेल चित्रीकरण आहे, अक्षरं आहेत. अशा परिक्षणानी कसा आमचा प्रेक्षक तयार होणार, बऱ्यावाईटाची दखल घेणार आणि चागल्यासाठी हट्ट धरणार ?

या सर्वाचा परिणाम म्हणूनच, आज नव्यानं आलेल्या प्रायोजित कार्यक्रमानी दूरदर्शनचे प्रेक्षक अक्षरशः भारून गेल्यासारखे झाले आहेत. हे सर्व पाहून एक सारख मनात येतं, को प्रायोजित कार्यक्रमांनी अल्पावधीत इतक्या झपाट्यानं दूरदर्शनला मागे टाकलंय याची दूरदर्शनवर काहीच प्रतिक्रिया नाही ? या आलेल्या पाव्हण्या कार्यक्रमानी घरच्या मालकालाच एकदम इतक निस्तेज, निष्प्रभ करून टाकावं ? या अशा आक्रमणामुळे, दूरदर्शनचे स्वतःचे जे प्रतिभावान निर्माते आहेत त्याना वैफल्य येणार नाही का ? कितीही जीव तोडून कार्यक्रम केला, तरी बघायला प्रेक्षकच नसला तर त्यांना काही नवीन निर्मिती करायला उत्साह वाटेल ? आधीच पैसा नाही. त्यात आता चांगले कलाकारही जास्त पैशासाठी प्रायोजकाच्यासाठीच काम करणार. कारण इतके दिवस कसं, निदान रगभूमीपेक्षा दूरवरच्या अनेक प्रेक्षकापर्यंत एकाच वेळी पोचता येत होत म्हणून दूरदर्शनच्या माफक पैशातही रंगभूमीवरचे काही चांगले कलाकार दूरदर्शनच्या कार्यक्रमात येत असत. परंतु तेही आता मिळणार नाहीत. कारण पैसा आणि प्रेक्षक दोन्हीही त्याना या प्रायोजित कार्यक्रमातून काम केल्याने मिळणार आहेत. तेव्हा अशा परिस्थितीत, दूरदर्शनच्या स्वतःच्या कार्यक्रमाच्या लोकप्रियतेचं काय होणार ? दूरदर्शनचं स्वतःच व्यक्तित्व या उपऱ्या प्रायोजित कार्यक्रमांमुळे पुसून गेलेल दूरदर्शनला आवडेल ? तसं होणं इष्ट आहे ?

प्रायोजित कार्यक्रम, दूरदर्शनवर आता कायमच्या वास्तव्यासाठी आले आहेत हे तर निर्विवाद आहे. सरकारला आणि लोकानाही ते हवे आहे. परतु त्याचो आणखी वारेमाप वाढ होण्याआधी, आपण प्रेक्षकानीही काही गोष्टीचा विचार करणं आवश्यक आहे अस मला प्रांजलपणे वाटत एक म्हणजे हे कार्यक्रम हिंदी आणि इग्रजीत असतात. मग यात आमच्या प्रादेशिक भाषेतल्या कार्यक्रमाचं काय ? प्रादेशिक भाषेतले कार्यक्रम एक खूप आधी, किंवा खूप नतर होतात, की जेव्हा ते लोकाना पहाता येत नाहीत. मग आमच्या भाषेचा आस्वाद आम्ही घ्यायचा कधी ? दुसरं अस की, इतक्या संख्येनं प्रायोजित कार्यक्रम असण आमच्या घराच्या, समाजाच्या दृष्टीनं योग्य आहे का ? आज हे कार्यक्रम सर्व कुटुब पहातं. आईवडील दमलेले असतात म्हणून, मुलांना लहान जागेत दुसरीकडे बसा म्हणणं शक्य नसत म्हणून दूरदर्शनचे डोळ्यावर होणारे दुष्परिणाम ३० वर्षांनंतर जाणवतील असं तज्ज्ञ म्हणतात. परदेशात लोकांना टि. व्ही. चं व्यसनच जडलय. लहान मुलं, मोठी माणसं सतत वाटेल त्या तऱ्हेचे कार्यक्रम पहात असल्यामुळे त्याचे त्या समाजावर होणारे दुष्परिणाम आपल्याला अगदीच दृष्टिआड करून चालण्यासारख नाही. याशिवाय, खरं सांगायचं तर या कार्यक्रमामुळे घर सगळं विस्कळित झालय. रात्रीच्या कार्यक्रमासाठी रविवारच्या कार्यक्रमासाठी वेळ हवा म्हणून गृहिणीची कामं, जेवण विस्कळीत. मुल तर त्याचं वाचन, अभ्यास, खेळ छंद, सारं काही दूर सारून सर्वांत आधी टि. व्ही. जवळ येऊन बसतात. कुणी भेटायला किंवा कामासाठी जरी आल, तरी साऱ्यांची तोडं वाकडी होतात इतकंच नाही तर मुलं म्हणतातही, हीच वेळ का सापडली या लोकाना यायला?

खरं म्हणजे रात्रीची हीच एक वेळ अशी असते की जेव्हा घरातले सगळे कुटुंबीय एकत्र येऊन, गप्पा गोष्टी करू शकतात. पण रोजच्या रोज हा वेळ असा बांधला गेला की सर्वांनी एकत्र बसणं, बोलणं, हा कुटुंबजीवनाचा एक आनंदाचा भाग अनुभवायचा कधी ? आधीच सध्याच्या या धकाधकीच्या जीवनात कुटुंबियाना एकत्र वेळ कमी मिळतो. वाचायला, इतर काही कामं करायलाही वेळ शिल्लक रहात नाही त्यात रोजच्या रोज हा रात्रीचा वेळ असा जायचा म्हणजे.

## अनिष्ट प्रवृत्तींचा शिरकाव

आणि या सान्यात, अनिष्ट प्रवृत्तीवर आधारित 'अपराधी कौन' सारखे कार्यक्रम असले म्हणजे तर बघायलाच नको. रविवारच्या चित्रपटांची निवड जागरूकपणे नाही, त्यात या कार्यक्रमाची भर. रोजच्या रोज होणाऱ्या या प्रायोजित कार्यक्रमाबरोबर आपल्या घरात नकळत शिरणाऱ्या या प्रवृत्तीचा आपण विचार करायला हवा असं मला वाटतं. या कार्यक्रमाकडे वर वर पाहून त्याबद्दल विचार करायची चालढकल करू नये. कार्यक्रमाच्या दर्जाबद्दल तर आपण जागरूक राहायलाच पाहिजे, पण आपण काय पहातो, आणि आपल्यामुळे आपली मुलं काय पहातात याकडेही आपण दुर्लक्ष करता कामा नये.

शिवाय आणखी असं आहे की दूरदर्शन हे साऱ्या कुटुंबाने एकत्र येऊन बघण्याचं करमणुकीचं साधन आहे. लहान, मोठे– त्यामुळे मोठयाच्या आणि मुलाच्या वयातलं अंतर कमी व्हायला लागलंय. लहानांच्या आणि मोठयांच्या विषयाचा सगळी जण एकत्रच विचार करायला लागली आहेत. त्यामुळे गुन्हेगारी, कामजीवन अशासारखे मोठेपणी आयुष्यात शिरणारे विषय मुलाच्या आजच लहानपणीच समोर येताहेत. मुलाना अकाली प्रौढत्व यायला लागलय. आज नाही पण आणखी २० वर्षांनी या साऱ्याचे समाजावर होणारे परिणाम आपल्याला दिसायला लागतील. म्हणूनच या कार्यक्रमाची सख्या, विषय याचा खोलवर विचार होणं जरूर आहे आज हव्या त्या प्रवृत्तीवर कार्यक्रम दाखवले, तर उद्या त्यात कॅबरे येईल, स्मगलिंग येईल आणि मुलाच्या आणि पर्यायाने समाजाच्या दृष्टीने विघातक अशा किती तरी गोष्टी सर्रास दिसू लागतील. श्रमपरिहार, करमणूक किंवा ज्या पालकाना एवढी मुलांची काळजी आहे त्यांनी स्वतःच ते कार्यक्रम पाहू नयेत हे म्हणणं सोप आहे. पण अस म्हणून सहजी दूर करण्यासारखी ही गोष्ट नाही. त्याचे दूरगामी परिणाम आपण कुटुंबियानी तर लक्षात घ्यायला हवेच, पण दूरदर्शनसारख्या जबाबदार सरकारी माध्यमालाही याबाबतीत बेफिकीर राहून चालणार नाही, राहू नये.

## ग्रामीण प्रेक्षकाकडे

प्रायोजित कार्यक्रमाची निवड आता अधिक डोळसपणे व्हायला हवी. याची जाणीव आता दूरदर्शनला व्हायला लागली आहे अस दिसायला लागलय. म्हणूनच ७० टक्के लोकापर्यंत पोचण्याचा प्रयत्न करत असतानाच तळागाळातल्या लोकानाही करमणुकीबरोबरच लोकशिक्षणही मिळालं पाहिजे, अशा तऱ्हेचं धोरण कार्यक्रमाची निवड करताना दूरदर्शन स्वीकारत आहे शहरी प्रेक्षकापेक्षा की, ज्याना इतर अनेक तऱ्हेची ज्ञानाची, करमणुकीची साधनं उपलब्ध असतात, त्यांच्यापेक्षा जास्त करून ग्रामीण, अशिक्षित प्रेक्षकाकडे या कार्यक्रमाच लक्ष रहाणार आहे. दुसरा चॅनेल शक्तिशाली झाला, म्हणजे साऱ्या महाराष्ट्रभर त्याचे कार्यक्रम पहाता येतील आणि त्यावर मराठी कार्यक्रमांचं प्रमाणही वाढेल प्रायोजित कार्यक्रमांच्या निवडीबद्दल दूरदर्शनचा आता आणखी एक दृष्टिकोन रहाणार आहे. आतापर्यंतच्या प्रायोजित कार्यक्रमात जास्त करून उत्तरभारतीयच वातावरण होत. पूर्वेकडचं किंवा दक्षिणेकडचं वातावरण त्यात फारस आल नाही. तेव्हा यापुढे दक्षिणेतल्या आणि पूर्वेकडच्या भारतीय वातावरणाच्या पार्श्वभूमीवरच्या निर्मितीला प्राधान्य देण्यात येणार आहे. यावर अर्थातच काही निर्मात्याच असं म्हणण आहे की, निर्मितीचं हे क्षेत्र साऱ्यांनाच सारख्याच कलाविष्कारासाठी खुल असावं इथ प्रांतीय वातावरण निर्मितीच बंधन असू नये. आतापर्यंतचे बहुतेक कार्यक्रम मुंबईच्या निर्मात्यानी तयार केले म्हणून त्यात उत्तर भारतीय वातावरण आलं. बंगाली किंवा मद्रासी निर्मात्यानीही प्रायोजित कार्यक्रमाची निर्मिती करावी आणि त्यात तिकडचं वातावरण आणावं. पण निर्मितीसाठी अशी कक्षा निर्माण करू नये.

प्रायोजित कार्यक्रम जसे स्थिरावतील, तसा त्याचा प्रेक्षकावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास जास्त काटेकोरपणान करायची जरुरी भासेल. अमेरिकेत 'नेल्सन्स रेटिंग' सारखी यंत्रणा की, जी टि. व्ही. च्या विविध कार्यक्रमाची एखाद्या बॅरोमीटरसारखी दखल घेत असते, तशी कार्यक्षम यंत्रणा इथेही यायला हवी. तिथे तर इतक्या नोदी होतात की, ऋतुमानाप्रमाणे कार्यक्रमाचा प्रेक्षकवर्ग कमी जास्त होतो याचीही दखल घेतली जाते तेव्हा सामाजिक सदर्भ आणि लोकशिक्षण जे या प्रायोजित कार्यक्रमामध्ये हवं आणि येईल असं आपण म्हणतो, त्यादृष्टीनं तर अशी पहाणी करणाऱ्या यंत्रणेची फारच गरज आहे.

## जागरूक निर्माते–प्रेक्षक

प्रायोजित कार्यक्रमाची प्रेक्षकावर आज जरी एवढी जबरदस्त मोहिनी असली, तरी त्याच्या निवडीबद्दल दूरदर्शनचं धोरण जर डोळस असेल, तर प्रायोजकानाही लोकाना आवडत ते द्यायच आणि म्हणून लोकांना आवडणार काहीही द्यायच ही कृती बदलावी लागेल आणि खरोखरच विचारपूर्वक कार्यक्रम निर्माण करावे लागतील. चांगल्या कार्यक्रमासाठी निर्मात्यांच्यातच मग स्पर्धा सुरू होईल आणि जे खरोखरच चांगले कार्यक्रम आहेत ते टिकून रहातील. 'हमलोग' सारखा सर्वांना आपला वाटणारा कार्यक्रम आपली लोकप्रियता टिकवून आहे इतकच नव्हे तर या कार्यक्रमाची बी. बी. सी. न मागणी केली आहे. प्रायोजित कार्यक्रमाच्या मिळालेल्या या संधीमुळे निर्मात्यानी आतापर्यंत फारसा विचार न करता लोकाना आवडणारे चित्रपट नाही तर इग्रजी कार्यक्रमाची नक्कल करणारे कार्यक्रम भराभर दिले खरे, पण खर सांगायच तर हीही मंडळी आज दूरदर्शनच्या निर्मितीत नवी आहेत. त्यामुळे या माध्यमाच्या प्रेक्षकाला काय हवं, काय आवडतं आणि काय द्यायला पाहिजे याचं त्यानाही नीट आकलन झालेलं

नाही. दूरदर्शनच तंत्रही त्यांच्या सरावातल नाही. चित्रपटाचा अनुभव असला, तरीही दूरदर्शनच्या माध्यमाची जाण असणही आवश्यक आहे हे निर्मात्यांच्याही आता लक्षात यायला लागल आहे. तेव्हा प्रायोजित कार्यक्रमांच्या स्पर्धेत जर यशस्वीपणे टिकायचं असेल तर कार्यक्रम अगदीच झटपट रंगाऱ्यासारखे न उरकता त्याची निर्मिती अधिक कार्यक्षमतेनं, विचारपूर्वक करायला हवी हे त्यानाही मान्य व्हायला लागणार आहे.

प्रायोजित कार्यक्रमाचा दूरदर्शननी आणि निर्मात्यानी आरभलेला हा सारा प्रपच शेवटी आपल्या प्रेक्षकांकरिता आहे हे आपणही विसरता कामा नये. तेव्हा चागल्या आणि वाईट दोन्हीही कार्यक्रमाची जबाबदारी दूरदर्शनइतकीच आपल्या प्रेक्षकावरही आहे. चागला कार्यक्रम हक्कानी मागायचा आणि वाईट कार्यक्रम चालू द्यायचा नाही हे करण्याच काम आपलं आहे. 'पदरी पडलं आणि पवित्र झाल' असं म्हणून उदासीनतेन नामानिराळ राहृयलो, तर कधीच कुठेच काहीच चागल घडणार नाही. यासाठी आम्ही प्रेक्षकानीही भावनेच्या आहारी न जाता, अधिक समजस, जागती भूमिका ठेवली पाहिजे. 'टाइम पास' ठीक आहे, पण प्रायोजित कार्यक्रमाची सख्या, वेळ काय असावी इथपासून ते त्याची निर्मिती, दर्जा आणि दूरगामी सामाजिक परिणाम इथपर्यंत डोळसपणे विचार करायची सवय लावून घेतली पाहिजे. 'हं. कसले कार्यक्रम' अस म्हणून स्वस्थ बसण योग्य ठरणार नाही. नागरिक म्हणून ज्यावेळी एखादी योग्य ती गोष्ट आपल्याला मिळत नाही, त्यावेळी ती मिळण्यासाठी, देणाऱ्याइतकीच घेणाऱ्याचीही जबाबदारी असते. आपण काहीच हालचाल करायची नाही आणि सर्व आयतं मिळालं पाहिजे अशी जर आम्ही वृत्ती ठेवली, तर कुठेच, काहीच योग्य गोष्टी घडणार नाहीत. शेवटी या प्रायोजितांचं प्रयोजन आपण प्रेक्षक, ग्राहक आहोत. तेव्हा आपल्या सुजाणतेवरच या कार्यक्रमांचं खरं मूल्य अवलंबून राहील. नाही तर 'अहो रुपम् अहो ध्वनिम्' या दूरदर्शन आणि प्रायोजकाच्या खुषीत आपल्या प्रेक्षकाच्या मात्र काही तरीच रूपं डोळ्यासमोर यायला लागतील आणि काही तरीच ध्वनी ऐकायला मिळत राहतील!! □

## मैत्रिणींच्या गप्पा

# दो या तीन बस; पण कसे?

मुंबईमध्ये 'मैत्रिणी' हे एक महिलाचे व्यासपीठ आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी दादरला अँश लेनमधील पिंटो व्हिला हायस्कूलमध्ये दुपारी साडेतीन वाजता अनेक महिला चर्चेसाठी जमतात. चर्चा म्हटली की कोणीतरी एकीने व्याख्यान द्यायचे, नतर श्रोत्यांनी वक्त्याला प्रश्न विचारायचे, वक्त्याने उत्तरे द्यायची असे बहुतेक चर्चेचे स्वरूप असते. 'मैत्रिणी'च्या चर्चेचे स्वरूप यापेक्षा वेगळे, मोकळेपणाने गप्पा करण्याचे असते. कोणीतरी एकजण विषयाचे अगदी थोडक्यात प्रास्ताविक करते. बहुतेक तीच सूत्रचालन करते. मग त्या विषयाबद्दलचे स्वत:चे अनुभव, विचार जमलेल्या महिला सांगतात. एकीच्या अनुभवावर, विचारावर दुसरीची अनुकूल / प्रतिकूल प्रतिक्रिया ती ताबडतोब व्यक्त करू शकते. यातून घरोघरच्या समान समस्या, समान सुखदु:खे पुढे येतात. त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जातो. मनात निरनिराळे विचार घेऊन स्त्रिया घरी जातात.

जुलै महिन्याच्या एका शनिवारी 'मैत्रिणी'च्या चर्चेचा विषय होता–'दो या तीन बस; पण कसे?' चर्चेचे प्रास्ताविक आणि सूत्रचालन एका डॉक्टर तरुणीने केले. 'सततीनियमन' हा विषय मुंबईतील महिलांनी चर्चेसाठी निवडावा याचे मला आश्चर्य वाटले. अनेक प्रकारच्या जाहिराती, लेख यातून सततीनियमनाचे महत्त्व, साधने याची माहिती दिलेली असते. शहरामध्ये याबद्दल अज्ञान नसते. खरे म्हणजे चघळून चोथा झालेल्या विषयाची आता वेगळी चर्चा ती काय करणार? परंतु चर्चा ऐकली तेव्हा वाटले या प्रकारची चर्चा अतिशय आवश्यक होती. चर्चेत भाग घेणाऱ्या सर्वजणी मध्यमवर्गीय, साधारणपणे पदवीधर होत्या. त्यात नोकरी करणाऱ्या होत्या तशाच नोकरी न करणाऱ्याही होत्या. विवाहित होत्या. अविवाहित होत्या. सर्वजणी अठरा ते पंचेचाळीस वयोगटातील होत्या.

डॉक्टर तरुणीने प्रथम सांगितले : सततीनियमनाच्या पद्धती सागणं हे अगदी सोपं आहे. ते मी तुम्हाला नंतर सागीनच. पण आधी तुम्ही मला अस सांगा, विवाहापूर्वी, विवाह ठरल्यावर सततीनियमनासबधी तुम्ही काही विचार केला होता, केला आहे का? लग्नानतर किती काळानी मूल हवसं वाटत होतं? सततीनियमनासंबधी घरात आईजवळ, इतर मैत्रिणीजवळ तुम्ही काही बोलला होतात का? फॅमिली डॉक्टरला काही विचारल होत का?

सुरुवातीला झटकन कोणी काही बोलले नाही. नंतर एकीने सुरुवात केल्यावर मात्र बऱ्याचजणी बोलू लागल्या. प्रश्नोत्तरे एकमेकीमध्ये सुरू झाली डॉक्टरला शका विचारल्या जाऊ लागल्या. डॉक्टर शकांचे निरसन करू लागली. इतर काही प्रश्न समोर उपस्थित करू लागले. चर्चा ऐकण्यासाठी दोन पुरुष पत्रकारही बाजूला येऊन बसले होते. पण स्त्रिया अतिशय मोकळेपणाने बोलत होत्या. ते संवादच पुढे देत आहे.

'माझं लग्न माझ्या वयाच्या बावीसाव्या वर्षी पंधरा वर्षांपूर्वी झाले लग्नाच्या पहिल्या वर्षात मूल नको असं वाटायचं. संततीनियमनाची साधन वगैरे ऐकून माहिती होतं. पण नेमकं काय करावं हे कळत नव्हतं. आईला वगैरे विचारणही जमलं नाही. संकोच होता, कोणालाच काही विचारलं नाही. परिणाम व्हायचा तोच झाला. लगेचच दिवस गेले. लग्नानंतर अकरा महिन्यांनी मला मुलगा झाला. नवऱ्याशी, सासरच्या माणसाशी नीट परिचय नाही. त्यात गरोदरपण नकोसं वाटलं. हिंडण्याफिरण्याची मजा करता आली नाही. संसारात व्यवस्थित रूळण्यापूर्वीच मुलाचं आगमन झालं. नंतर मात्र मी विचारपूर्वक डॉक्टरांच्या सल्ल्याने

काळजी घेतली. दुसर मूल पाच वर्षांनी होऊ दिलं. पण मला वाटत लग्नानतर लगेच गरोदरपण येऊ नाही. सहजीवनाच्या समरसतेसाठी, आनंदासाठी लग्नानतर एक वर्ष सततीनियमनाची काळजी घ्यावी. मी हल्ली काय करते, माझ्या ओळखीत, नात्यात कोणाही मुलीचं लग्न ठरल की, पहिल्यांदा जाऊन तिला प्लॅनिंगच्या गोळधा, त्या कोणत्या दिवसापासून घ्यायला लागतात वगैरेची माहिती देते कोणाकोणाला आवडणार नाही याची मला कल्पना असते. पण मला पटणार माझं कर्तव्य बजावते.

'लग्नानतर लगेच मूल होऊ नाही असं मलासुद्धा वाटायच. पण अगदी लग्न झाल्या दिवसापासून भोवताली सगळधाचं मूल होण्यासाठी अगदी प्रेशर. ' पहिल्यादा प्लॅनिंग करून नाही बर का ! एक मूल झाल्यावर ठीक असत ते. अस भोवतालच्या शेजारणी, ऑफिसमधल्या मैत्रिणी म्हणायच्या. त्यामुळे प्लॅनिंगचा विचार करण्याचा धीरच मला झाला नाही. लग्नाच्या वाढदिवसाला आई झाले पण अगदी वाटत लग्नानतर प्रत्येकीला एक वर्ष खर म्हणजे मोकळं मिळाल तर बरं होईल.'

आपल्याकडे हेच होतं भोवतालचे लोक फार मधे मधे तोड घालतात. लग्नानंतर लगेच मूल नको हे मी माझ्या नवऱ्याला सांगितल होतं. त्याची पण हरकत नव्हती. पण कोणाकोणाच्या बोलण्यामुळे पील्स घेण्याची मला भीती वाटायची. डॉक्टरसुद्धा पहिल्या वेळी पील्स घेण्याच्या फॉर नव्हते. म्हणून नवऱ्याने साधन वापरण्याचं ठरवल. पण ते बरोबर जमल नाही. नको असताना पहिल्या वर्षी मुलगी झाली नतर लगेच दुसर मुल नको म्हणून पील्स सुरू केल्या. पण एक मुलगी झाली तरी लोकांच समाधान नाही. दुसर कधी. ही चौकशी करतात, प्लॅनिंग चालू आहे का ही चौकशी. प्लॅनिंग करू नका, वेळच्या वेळी सगळ होऊन गेलेलं बर असा अगदी हैराण करणारा लोकाचा उपदेश चालूच. या भोवतीच्या लोकांपुढे काय कराव हेच मला कळत नाही.

मूल होण्याची घाई माहेर, सासर दोन्ही घराना इतकी कमालीची असते, की त्या सबंधित ' स्त्री'चा विचार कोणाच्या मनातच येत नाही. याला काय करायच ?

आमचा प्रेम–विवाह आहे. आमची ओळख होती तरीसुद्धा लग्नानतर पहिल्या वर्षी मूल ही कल्पना मला अगदी कशीतरी वाटायची. ज्याची आधी ओळख नसते त्या ठरवून केलेल्या लग्नात तर लग्नाच्या वाढदिवसाला मूल ही कल्पना मला अगदी अश्लील आणि घाणेरडी वाटते. म्हणून मी लग्नाआधी सतती नियमनाची सगळी माहिती करून घेऊन यथास्थित प्लॅनिंग केलं. लोकाची पर्वाच केली नाही.

अहो, पण सगळघांनाच अस वागणं जमत नाही. माझा अनुभव सांगते. माझ्या लग्नाला आता चौदा वर्ष झाली लग्न ठरल्यावर, झाल्यावरही, संतती नियमनाचा विचार मी केला नाही. विचार करायला पाहिजे असही वाटलं नाही लग्नानतर लगेचच दिवस गेले. मी एकवीस वर्षांची होते. नवऱ्याशी नुकतीच ओळख झालेली. सासरी नवीन. डोहाळे अगदी कडक लागले. काही खाणं जायच नाही. काम करता यायचं नाही. अगदी लाज वाटायची. त्यात घरात येणाऱ्याशी हसून-खेळून बोलायचं, माहेरच्या सवयी सोडून सासरशी जुळवून घ्यायच हे सगळं करताना इतक्या कठीण अनुभवातून मी गेले. ते गरोदरपण, बाळंतपण याचा मनात अगदी धसका बसला. पहिला मुलगा झाल्यानतर वाटल,पुन्हा कधी या अनुभवातून जाऊ नाही. मग मी प्लॅनिंगची अगदी काळजी घेतली. मला मुलीची आवड भोवताली लहान मुलगी बघितली की क्षणभर वाटायचं, आपल्याला मुलगी हवी. पण लगेच मन धसकायचं. पहिल्या मुलानंतर नऊ वर्षांनी मला मुलगी झाली. तीसुद्धा कावीळीमुळे पील्स घेण शक्य नव्हतं म्हणून झाली. ससाराची घडी नीट बसल्यावरच पहिल्या मुलाचं आगमन व्हावं. म्हणजे असा धसका बसणार नाही असं मला वाटतं.

माझा अनुभव वेगळा आहे. माझ्या लग्नाला बारा वर्षं झाली. लग्नात मी तेवीस वर्षांची होते. लग्न ठरल्याबरोबर माझ्या आईनी मला सतती नियमनाची व्यवस्थित माहिती दिली. एक वर्ष मूल न होऊ देण्याचा सल्ला दिला. लग्नानतर सासूबाईंनीसुद्धा मला नीट लैंगिक माहिती देऊन प्लॅनिंगचा सल्ला दिला. आम्ही दोन वर्षं प्लॅनिंग केल. सासरी, माहेरी, कोणी मला जरासुद्धा प्लॅनिंगवरून टोकलं नाही.

अहो तुम्ही भलत्याच भाग्यवान ! अगदी रेअर केस आहे तुमची ! आदर्श म्हणून लोकापुढे मांडली पाहिजे ही केस ! नाही तर बाईला मूल व्हावं म्हणून सगळघानाच अशी घाई सुटली असते की काही विचारायला नको ! अहो डॉक्टर मला असं कळत नाही की डॉक्टरसुद्धा पहिलं मूल होण्याआधी प्लॅनिंग का नको म्हणतात ?

डॉक्टर : स्त्रीच्या मनाचा, ससारातल्या इतर अडचणींचा डॉक्टर विचार करीत नसतात. ते फक्त शरीरशास्त्राच्या दृष्टिकोनातून सांगतात. एक मूल झाल की स्त्री पुरुष दोघाचोही निर्दोषता सिद्ध होते. म्हणून एका मुलानतरच प्लॅनिंगचा सल्ला बहुतेक डॉक्टर देतात.

पण डॉक्टर, समजा फ्लॅट बाधून होत असला, जागेच्या दृष्टीनी, पैशाच्या दृष्टीनी लग्नानतर दोन–तीन वर्षं मूल नको असलं तर ?

डॉक्टर : डॉक्टरला याच्याशी कर्तव्य नाही.तुमच्या फर्टिलिटीबद्दल खात्री होण्याच्या दृष्टीने डॉक्टराचा सल्ला असतो.

डॉक्टर, पील्सचे इतर परिणाम ( side effects ) असतात का ?

डॉक्टर : हो. निश्चित असतात. कोणत्याही ड्रगला साइड इफेक्टस् असतातच. सततिनियमनाच्या गोळघामुळे उलटघा होऊ शकतात. जाडेपणा येतो. हातापायांच्या शिराचं दुखण उद्‌भवू शकत. हे स्वीकारण्याची तयारी पाहिजे. काही चागले परिणामही असतात. ज्यांची मासिक पाळी अनियमित असते ती अगदी नियमित होते. पील्स घेत असताना बरोबर अठ्ठावीस दिवसानी पाळी येते. पील्स सातत्याने घ्यायच्या नसतात. डॉक्टरच्या सल्ल्यानेच घ्यायच्या. काही काळ थाबवायच्या तेव्हा लूप, ताबी, निरोध या साधनाचा उपयोग करायचा. नंतर पुन्हा पील्स सुरू करायच्या. आता अगदी नवीन म्हणजे सतनीनियमनाची इंजेक्शन निघाली आहेत. दर सहा महिन्यानी स्त्रीला हे इजेक्शन द्यायचे.

डॉक्टर, मी या इजेक्शनबद्दल वाचले आहे. इग्लड, अमेरिकेत या इंजेक्शनवर बंदी आली आहे. ते इंजेक्शन आपल्याकडे गरीब, झोपडपट्टीतल्या बायकांवर सर्रास वापरल

जात असं कळल हे खरं आहे?

डॉक्टर : हे बघा, त्याच्याकडे बदी आली आहे हे खरं. पण त्याचे सगळे नियम, त्याचे जीवनमान, रहाणीमान याप्रमाणे आहेत. आपल्या आणि त्याच्या सामाजिक परिस्थितीत फार तफावत आहे. एकदम गैरसमज करून घेण्याचं कारण नाही. आपले डॉक्टर विचार करून काळजीपूर्वक ही इंजेक्शन्स वापरतात

डॉक्टर, पील्स इंजेक्शन पुरुषासाठी का नाही? सगळ बायकानाच देता!

डॉक्टर : पुरुषांना इंजेक्शन देण्याच्या दृष्टीने संशोधन सुरू आहे. अजून ते यशस्वी झाल नाही. सध्या पील्स, इंजेक्शन दोन्ही स्त्रियासाठीच. पुरुषासाठी फक्त काही साधनं आहेत. स्त्री आणि पुरुष दोघाच्या शरीराची रचना याला कारण आहे.

डॉक्टर, शकुतला पराजप्यानी सांगितलेल्या साधनाचा किती उपयोग होतो? सततिनियमनासाठी इतर नैसर्गिक पद्धती म्हणजे मासिक पाळीनतर विशिष्ट दिवशी इंटरकोर्स केल्यास गर्भधारणा होत नाही हे कितपत खर?

डॉक्टर : नैसर्गिक पद्धतीचा उपयोग होतो. तेलचिंधीचाही होतो. पण जेव्हा जास्त प्रगत उपाय हातात नव्हते तेव्हाचे ते मार्ग होते. आता निश्चित साधनं आपल्या हातात आहेत.

मी सोशल वर्क म्हणून फॅमिली प्लॅनिंग सेंटरमध्ये काम करते खरा प्रश्न असतो अडाणी बायकाचा. त्याना नवऱ्याचं सहकार्य मुळीच नसत. गोळ्या घ्यायला विसरतात. कधी सासरची माणसं घेऊ देत नाहीत. मग दिवस गेले की आमच्याकडे धावत येऊन म्हणतात, 'बाई पिशवी धुवून टाका' गर्भपात इतका सोपा नसतो. तो किती महिन्यापर्यंत करायचा, कितीदा करायचा याला मर्यादा असतात.

अडाणी काय, आपल्या मध्यमवर्गीयांमधेसुद्धा प्लॅनिंग करताना घरातल्या माणसाची अडचण असतेच. पहिल मूल होण्याआधी प्लॅनिंगला कोणाचं सहकार्य नसतं हे आता सगळ्यांच्या बोलण्यावरून दिसलंच.

पण मी म्हणते मुलाला जन्म देणं न देणं हे पूर्ण बाईच्या इच्छेप्रमाणे पाहिजे. कारण सगळ्या वेदना तिला सोसायच्या आहेत. घरातल्या लोकाच्या नकळत तिने पील्स घ्याव्यात. बाकीच्याना कळेलच कस प्लॅनिंग आहे की असच अजून गरोदरपण आलेलं नाही?

अगबाई, घरातली माणसं स्वस्थ बसलेली नसतात. लग्नानंतर सहा महिन्यात काही चिन्हं दिसली नाहीत तर सासूसासरे सुनेला डॉक्टरकडे नेतात.

अग मग आत गेल्यावर डॉक्टरला सागून टाकायचं खरं काय ते!

म्हणजे नतर घरात कळणारच. चोरून केल्यावर आणखी राग येणार. पुढे काही वेडवाकड झालं की दोष आपल्यावर येणार.

पहिल्या मुलापूर्वीही प्लॅनिंग करणाऱ्या बायका माझ्या माहितीत आहेत. त्याची मुलं अगदी छान आहेत डॉक्टराचं काहीतरीच. आपल्या डॉक्टर लोकामधेच सुधारणा करायला पाहिजे.

डॉक्टर : तुमच्या बोलण्यावरून मला असं दिसतं, सततीनियमनाच्या साधनाबद्दल सर्वसामान्य मुलींमध्ये अज्ञान आहे. साशकता आहे, भीती आहे.

हे अगदी खर आहे. मी जेव्हा ओळखीच्या लग्न ठरलेल्या मुलीला सांगते, अग अमूक तारखेला तुझं लग्न आहे मग मासिक पाळी झाल्याबरोबर अमूक दिवशी तू गोळ्या घ्यायला लाग तर तिला भीती वाटते. लग्नाच्या आधी असं काही घेणं म्हणजे पाप वाटतं. ही समजूत दूर केली पाहिजे.

शिवाय काहीना काय वाटतं पहिल्यांदा इटरकोर्स केल्यानं काही होणार नाही.

डॉक्टर : ही भ्रामक समजूत बऱ्याच जणाची असते. एका इंटरकोर्समधे गर्भधारणा होऊ शकते आणि दहावेळा सबध आला तरी गर्भधारणा होतसुद्धा नाही. त्याचे काही नियम नाहीत

हे सगळ लग्नाआधी माहिती पाहिजे हो तर उपयोग होतो.

छे: मुली हल्ली चागल्या वस्ताद असतात. माझी एक डॉक्टर मैत्रीण गिरगावात प्रॅक्टिस करते. ती म्हणाली पधरा–सोळा वर्षांच्या कितीतरी मुली तिच्याकडे ताबी बसवून घेण्यासाठी येतात.

माझा नाही विश्वास. पण एवीतेवी त्याचे कोणाशी सबध असतील तर अशा शहाणपणाबद्दल त्याना मानलच पाहिजे. माझ्या माहितीतला एक अनुभव सांगते. लग्नानतर दीड-दोन महिन्यानीच सून गरोदर राहिली. सासू तिच्या चारित्र्याचा संशय घेऊ लागली. मासिक पाळीच्या वेळी बाजूला बसण्याची घरात पद्धत होती. सून एकदा बाजूला बसली होती. पण पुरेसा हुडा न मिळाल्यामुळे सासू आधीच नाराज होती. ती सुनेला म्हणाली, एकदा काय तू खोटंच बाजूला असशील. हे आमचं मूल नाहीच. आधीच तुझी भानगड असेल. या दृष्टीनही लग्नानंतर लगेच गरोदरपण चागल नाही.

आपल्याकडे सततीनियमनाला विरोध करणारे राजकीय पक्ष आहेत. मुसलमानाची सख्या वाढते म्हणून हिंदूचीही वाढू द्या म्हणणारे. त्याना बायकानी चागले तासायला, झोडायला पाहिजे.

तेच ना हिंदू-मुस्लिम दोघानाही फॅमिली प्लॅनिंग करायला लावा लोकसख्या वाढू देण म्हणजे अडाणीपणा.

डॉक्टर, पील्समुळे कॅन्सरची शक्यता वाढते का?

डॉक्टर : कोणत्याही ड्रगमुळे कॅन्सरची शक्यता एक टक्का वाढते.

माझ्या मते आपल्या आजच्या कार्यक्रमाचं नाव चुकल. 'दो या तीन बस' अस आपण म्हटलं. पण आजची कल्पना एक या दो अशी आहे. याच्यापुढची वन् ऑर नन् अशी पाहिजे हो समजा एखाद्या स्त्रीला मूल नकोच असेल तर तिला तो अधिकार पाहिजे.

चर्चा सपली. चर्चा ऐकल्यावर वाटले, सततीनियमनासाठी शासकीय पातळीवर काही सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थामार्फत जोरदार प्रयत्न सुरू आहेत. शहरी मध्यमवर्गीय आधुनिक कुटुबात दोनपेक्षा अधिक मुले सहसा दिसत नाहीत. तरीही संततीनियमनाच्या साधनाबद्दल समाजमनात भय आहे. अज्ञान आहे. विवाहाआधी त्याची माहिती कळण्यासारखे वातावरण मुलीच्या भोवताली नसते. विशेषत: पहिले मूल होण्यापूर्वी नियमन करण्यास डॉक्टरांपासून सगळ्याचा विरोध दिसतो. परंतु काही व्यक्ती डॉक्टराची फिकीर न करता नियमन करताना आढळतात. काही डॉक्टराचीही हरकत नसते

विवाहाचे वय, पती-पत्नीच्या विवाह पूर्वपरिचयाचा काल, आर्थिक परिस्थिती

अशा अनेक बाजूंचा विचार करूनच संततीनियमनाचा विचार त्या व्यक्तींनी केला पाहिजे. कुटुंबाने, वडील पिढीने नवदांपत्यावर मूल लवकर होण्यासाठी दडपणे आणू नयेत. डॉक्टरांचे मत हे सर्व दृष्टींनी प्रमाण मानण्याचेही कारण नाही. कारण डॉक्टर हे या समाजाचेच घटक आहेत. समाजाच्या मतांचा प्रभाव त्यांच्यावर अगदी आपोआप होत असतो. एकेकाळी डॉक्टर मंडळी संततीनियमनाच्या गर्भपाताच्या पूर्ण विरोधात होती. आज ती तशी नाहीत. श्री. र. धों. कर्वे, श्रीमती शकुंतला परांजपे या वैद्यकीय क्षेत्रात नसलेल्या मंडळींनी संततीनियमनाचा विचार आपल्या देशात आणला, रूजविला-प्रसारीला. आपल्या सर्वसामान्य माणसांना या बाबतीत डॉक्टर हाच आधार असतो हे खरे. तरीही स्वतःचे तारतम्य वापरावेच.

अपत्यजन्म हा आपल्या घरोघरचा आनंद आहे. बहुसंख्य लोकांचो तो जोवन जगण्याची प्रेरणा आहे. तो जन्म देणे विज्ञानाने आपल्या हातात दिले आहे. जीवन अधिक आनंदमय करण्यासाठी विज्ञानाच्या देणगीचा उपयोग झाला पाहिजे. वृथा संकोच सोडून दिला पाहिजे.

—विनया खडपेकर

---

पुस्तके

# प्रतिभेच्या पर्वतशिखरांचे दर्शन

## ' दस्तयेवस्की '

जागतिक साहित्य क्षेत्रांत रशियन कादंबरीचे स्थान अग्रगण्य आहे. गेल्या शतकातील तुर्जेनिव्ह, गोन्चारॉव्ह, डोस्टोव्हस्की, टॉलस्टॉय यांच्यापासून अगदी अलीकडच्या पास्तरनाक, सोल्झेनित्सिनपर्यंत ही संपन्न परंपरा आजही टिकून आहे. डोस्टोव्हस्कीच्या कादंबऱ्याही गेली शे-दीडशे वर्षे लेखक-वाचकांच्या पिढ्याच्या पिढ्यांवर प्रभाव पाडत आल्या आहेत. ख्यातनाम फ्रेंच कादंबरीकार आणि तत्त्वज्ञ आंद्रे जीद म्हणतो त्याप्रमाणे डोस्टोव्हस्की हे एकच एक पर्वत शिखर नसून ती एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या उंचच उंच पर्वत शिखरांची रांग आहे. ह्या पर्वतराजीचे परिभ्रमण करणे ही काही सोपी गोष्ट नव्हे. पण तसा एक यशस्वी प्रयत्न श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी आता केला आहे.

ब्रदर्स कारामाझाव्ह, इडियट, डेव्हिल्स, क्राईम अँण्ड पनिशमेंन्ट, ह्या चार महाकादंबऱ्या, गॅम्बलर, लॅण्डलेडी, इटर्नल हसबंड, रॉ यूथ, नोट्स फ्रॉम अंडरग्राउण्ड ह्या त्या मानाने छोट्या कादंबऱ्या, पुअर फोक, व्हाईट नाईटस्, मीक वन ह्यासारख्या छोट्या कादंबऱ्या वाटाव्यात एवढ्या दीर्घ कथा, त्याशिवाय डायरी ऑफ ए रायटर हा लेखसंग्रह अशी डोस्टोव्हस्कीची प्रचंड साहित्यसंपदा आहे. मुळात डोस्टोव्हस्की हा काही फावल्यावेळी वाचायचा हलका-फुलका लेखक नव्हे. डोस्टोव्हस्कीच्या साहित्याचे वाचन हा एक गंभीर प्रयत्नच असू शकतो. त्याच्या त्या हजारो पृष्ठांच्या लिखाणांतून एक रोमांचक बौद्धिक आनंद मिळत असतो. अर्थात हे काम कठीण असल्याने सामान्यच नव्हे तर कित्येकदा अभिजात वाचकही त्याच्या वाटेला जात नाही; पण श्री. कुलकर्णी यांनी डोस्टोव्हस्कीच्या वाङ्मयाचा गेली काही वर्षे सातत्याने पाठपुरावा केला. उपलब्ध झालेले पाननपान वाचून त्याच्या कथाकादंबऱ्यांचे परिशीलन केले. त्यावर लेख लिहिले आणि ह्याच चिकित्सक लेखांचा संग्रह 'दस्तयेवस्की' नावाने आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला आहे.

ह्या लेखसंग्रहात एकूण आठ लहान-मोठ्या लेखकांचा समावेश केला आहे. डोस्टोव्हस्कीची कादंबरी, त्याचे जीवनप्रक्षेपण, डोस्टोव्हस्कीच्या बांधिलकीचे आणि तत्त्वमंथनाचे स्वरूप, त्याच्या साहित्यातल्या स्त्रिया आणि प्रेम अशा विविध साहित्य पैलूंवर लेखकाने प्रकाश टाकला आहे. हे लेख, ललित लिखाणासारखे स्वैर स्वरूपाचे नसून काहीसे निबंधांच्या किंवा शोध लेखांच्या स्वरूपात लिहिले गेले आहेत. डोस्टोव्हस्कीवर लिहिले गेलेले मराठीतले हे पहिलेच विवेचक पुस्तक असल्यामुळे, डोस्टोव्हस्कीच्या वाचकांना, अभ्यासकांना संदर्भग्रंथ म्हणून ते उपयुक्त ठरावे अशीच लेखकाने त्याची रचना, मांडणीही केली आहे. त्यात डोस्टोव्हस्कीच्या जीवनपटाबरोबरच, त्याच्या कादंबऱ्या, त्याच्यावरचे निवडक संदर्भग्रंथ त्यावरच्या लेखकाच्या छोट्या टीका-टिपणीसह दिल्याने संदर्भासाठी म्हणून ह्या पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे.

आधुनिक कादंबरीचा पाया प्रख्यात फ्रेंच कादंबरीकार फ्लोबेरने घातला. डोस्टोव्हस्की फ्लोबेरचाच समकालीन आणि त्याहून तोलामोलाचा कादंबरीकार; पण डोस्टोव्हस्कीची कादंबरी फ्लोबेरइतकी आखीव, रेखीव असत नाही. त्या उलट ती काहीशी विस्कळीत, कित्येकदा पाल्हाळीक, उपकथानकांची जोड दिलेली, असंख्य व्यक्तिरेखांनी गजबजलेली, चर्चा-वादविवादांनी व्यापलेली काहीशी अती नाट्यपूर्ण असते. डोस्टोव्हस्कीच्या कादंबरीच्या ह्या ढोबळ मर्यादा दाखवून देत असतानाच गीद, कामू, काफ्का, सात्र, सोल्झेनित्सिन ह्या नंतरच्या सगळ्याच मोठ्या कादंबरीकारांवर डोस्टोव्हस्कीचा प्रभाव पडत आल्याचेही लेखकाने दाखवून दिले आहे.

### जीवन प्रक्षेपण

लेखकाने आपल्या विषयाची मांडणी अगदी शास्त्रीय विश्लेषणात्मक पद्धतीने केली आहे. डोस्टोव्हस्कीच्या कादंबरीची संकल्पना, वैचारिकता आणि नाट्यपूर्णता ही ठळक वैशिष्ट्ये लेखकाने वाचकांपुढे ठेवली आहेत. एकाच माणसाची तार्किक नि

अतार्किकता, किंवा एकाची दुसऱ्यात भेट-णारी छायाव्यक्ती, आदर्श, निष्कपट माणसाचे चित्रण, विश्वबंधुत्वाचा पुरस्कार ह्यासारख्या कल्पना डोस्टोव्हस्कीने डबल, इडियट, कारमाझाव्ह ब्रदर्ससारख्या कादंबऱ्यातून मांडल्या आहेत. पण ह्या वैचारिक सकल्पना मांडताना, रगवताना डोस्टोव्हस्की कित्येकदा त्या कल्पनाच्याच आहारी कसा जातो तेही लेखकाने अचूकपणे दाखवून दिले आहे.

डोस्टोव्हस्कीच्या साहित्यातले जीवन प्रक्षेपण ह्या त्यातला सर्वोत्कृष्ट लेख. तो अतिशय सहज नि सुरेख उतरला आहे. पण 'कादंबऱ्यातील जीवन प्रक्षेपण' हे त्याचे शीर्षकच चुकीच्या दिशेने नेणारे आहे; तत्कालिन रशियन सामाजिक जीवन इथे लेखकाला अभिप्रेत नसून डोस्टोव्हस्कीच्या वैयक्तिक जीवनाचे त्याच्या साहित्यातून झालेले चित्रण तो तपासून पहाताना दिसतो. खरे तर, डोस्टोव्हस्कीच्या कथा कादंबऱ्यात झारकालीन रशिया, त्यातली समाजव्यवस्था सामान्य माणसाचे जीवन, सामाजिक घडामोडी अभावानेच पहायला मिळतात आणि ह्या लेखातही लेखकाने ह्या काहीशा साम्यवादी समाजाला पुष्टीच दिली आहे. व्यभिचारांतून झालेला वडिलाचा खुन, अपस्माराचे झटके, राज्यसत्तेविरुद्ध कट केल्याने झालेली फाशीची शिक्षा आणि झारनेच त्यातून ऐनवेळी अनपेक्षित केलेली सुटका, सायबेरियातला तुरुंगवास, जुगारीवृत्ती, पोलिना सुस्लोवा ह्या सुदर समाजवादी लेखिकेबरोबरचे असफल प्रेमप्रकरण ह्या सहा घटनाचा डोस्टोव्हस्कीच्या साहित्यावरचा परिणाम लेखकाने समर्थपणे तपासला आहे. त्यातही डोस्टोव्हस्कीची फाशी आणि सुटका हा भाग विलक्षण वाचनीय झाला आहे.

ह्या सर्वच लेखाचे स्वरूप विश्लेषणात्मक आहे. डोस्टोव्हस्कीच्या आयुष्यातल्या बांधिलकीचा विचार करताना लेखकाने त्याच्या सामाजिक, धार्मिक बांधिलकीबरोबरच त्याचा राष्ट्रवाद, विज्ञाननिष्ठा आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे माणसाशी असलेल्या बांधिलकीचा वेगवेगळा विचार केला आहे. झारने फाशी माफ केल्याने डोस्टोव्हस्कीच्या सामाजिक बांधिलकीच्या कल्पनेत निश्चितच बदल घडून आला. दुसऱ्या अलेक्झांडर झारबद्दल त्याच्या मनात त्यानंतर नेहमीच काहीशी कृतज्ञता भावना जागृत राहिली. झारशाहीविरुद्धच्या चळवळीतल्या सहभागाला तो स्वत.चा तरुण वयातला अविचार समजत होता. म्हणूनच डोस्टोव्हस्कीने समाजवादी चळवळीला दगा दिल्याची गॉर्कीची भावना होती. डोस्टोव्हस्कीच्या ह्या विविध बांधिलकीचा उत्कृष्ट उहापोह लेखकाने ह्या पुस्तकात केला आहे. लेखकाचे एकूणच साहित्यवाचन विस्तृत आहे. असख्य विदेशी साहित्यकारांबरोबरच, अस्सल भारतीय साहित्य, समाजकारणातले संदर्भ त्याने डोस्टोव्हस्कीच्या तुलनेत जागोजागी उद्धृत केले आहेत. 'वर्डस्वर्थमध्ये जसा 'निसर्ग', तुकारामात जसा 'विठ्ठल' तसा डोस्टोव्हस्कीत 'माणूस' केंद्र ठरतो' असे लेखक सहजपणे म्हणून जातो. अशा सदर्भांच्या भारतीयत्वामुळे डोस्टोव्हस्कीबद्दल वाचकाच्या मनात अधिकच आपलेपणाची भावना निर्माण होते.

डोस्टोव्हस्कीच्या साहित्यात त्यांच्या अवतीभोवतीच्या समाजाप्रमाणेच निसर्गाचे दर्शनही मजिवात घडत नाही. मॉस्को–पिटर्स बर्गच्या अंधाऱ्या कोपऱ्यात त्याच्या कथा कादंबऱ्यातली माणसे नेहमी वावरतात. बऱ्याचदा ती क्रूर, मनोविकृत, एकलकोंडी, वागण्यातली सुसगती हरवलेली, विलक्षण विक्षिप्त असतात. इतकेच नव्हे तर डोस्टोव्हस्कीनं सात्विकतेचा प्रतिक म्हणून रगविलेला कारमाझाव्ह ब्रदर्समधला अल्योषा किंवा जगातल्या निष्कपटतेचे प्रतिक म्हणून लिहिलेला इडियटमधला प्रिन्स मिश्कीन हेही केव्हा ना केव्हा आपला तोल गमावून बसतात. शारीरिक किंवा रोमॅंटिक पातळीवरच्या प्रेमाला डोस्टोव्हस्कीच्या कादबरीत थारा नसतो. त्याच्या स्त्री व्यक्तिरेखादेखील एकतर सुदर गर्वोन्नत नाही तर सुंदर पण सात्विक, सहनशील वृत्तीच्या असू शकतात. ह्या सुदर पण गर्विष्ठ स्त्रिया त्याने आपली समाजवादी प्रेयसी पॉलिना सुस्लोव्हावरून रगवलेल्या आहेत, असे लेखक म्हणतो. पण काही असले तरी, डोस्टोव्हस्कीच्या साहित्यातली कुठलीही स्त्री भले ती बुद्धिमान, सुदर का असेना ती कधीच इतर स्त्रियासारखी वागत नाही, वाटत नाही. ती बऱ्याचदा असबद्ध, खुनशी, बेताल वागताना दिसते आणि म्हणूनच वाचकाच्या मनात खटकत रहाते.

लेखकाने डोस्टोव्हस्कीच्या छायाव्यक्ती, प्रेम, विश्वबधुत्व ह्यासारख्या कल्पनांची विस्तृत चर्चा आपल्या लेखातून केली आहे. त्याने छाया–व्यक्तीसारखा सोपा नि सार्थ शब्द 'डबल' साठी वापरला असला तरी त्याचबरोबर अपसामान्य, स्वकायदुश्चिता, विषादविकृती, नसविकृती, उभय भाविता, अबौद्धिक शक्ती यासारखे मराठी शब्द इग्रजी शब्दाकरता, जागोजागी वापरले आहेत. अशा अवघड शब्दानी, आणि काही लेखातल्या त्याच्या अवघड वाक्यरचनानी कित्येकदा पुस्तकाच्या वाचनीयतेला बाधा येते. मुळातच डोस्टोव्हस्कीसारखा गंभीर विषय, त्याच्या असख्य कादबऱ्या, शेकडो व्यक्तिरेखा, आणि त्यावरचे हे चिकित्सक लेख ह्या सगळ्याचा विचार करता लेखकाला अभिप्रेत असलेले परिचयात्मक स्वरूप पुस्तकाला रहात नाही. लेखकाने डोस्टोव्हस्कीच्या कथा–कादबऱ्याचे विषय थोडक्यात का होईना ह्या लेखातून कुठेतरी माडले असते तर डोस्टोव्हस्कीचा मराठी वाचकाना अधिक जवळून परिचय झाला असता.

आपल्या साहित्यातून जीवनभर विश्वबंधुत्वाचा उद्घोष करणारा, ख्रिश्चॅनिटीमध्येच प्रेम पहाणारा, माणसातल्या तार्किक-अतार्किकाचा सातत्याने शोध घेणारा, 'ईश्वराशिवाय माणूस जगूच शकणार नाही' अस सागणारा, 'दुःखयातनांचा प्रेषित' म्हणून गौरवला गेलेला डोस्टोव्हस्की एक असामान्य साहित्यकार होता ह्यात शका नाही. गेले सुमारे दीड शतक वैचारिक विश्वावर अधिराज्य गाजवणाऱ्या अशा थोर साहित्यिकावर कितीही लिहिले तरी ते अपुरेच ठरेल. जगातल्या समीक्षकानी डोस्टोव्हस्कीवर आजवर शेकडयानी पुस्तके लिहिली असली तरी मराठीतले अशा स्वरूपाचे हे पहिलेच पुस्तक असल्याने तितकेच मोलाचे आहे. आजच्या सवग, उथळ, चाकोरीबद्ध आणि वारेमाप प्रमाणात प्रसिद्ध होत असलेल्या मराठी कादंबरीकडे पहाता डोस्टोव्हस्कीच्या साहित्यविश्वाचा आपण परिचय करून घेणे आवश्यक ठरते. साहित्याच्या अशा टेकाडातून फिरणाऱ्या आमच्या करमणूकप्रिय वाचकाना प्रतिभेच्या पर्वतशिखराचे हे दर्शन निश्चितच मननीय वाटेल.

—अशोक प्रभाकर डांगे

दस्तयेवस्की
ले. अनिरुद्ध कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृष्ठे : १५१
कि. : पचवीस रुपये

# धुन

फुलाच्या सौंदर्याचा आस्वाद त्याचा रंग, गंध, आकार अशासारख्या त्याच्या गुण-निकषांवरून पडताळावा लागेल; ते कुठे उमलले—वनात, उपवनात, उद्यानात, वाटिकेत की फुलदाणीत—त्या स्थानावरून नव्हे, त्याच प्रमाणे साहित्यकृतीची गुणवत्ता ती नियतकालिकात, मासिकात, वृत्तपत्रात की अन्यत्र कुठे झाली यावरून अजमावता येणार नाही. वृत्तपत्रातील मजकुराला तत्कालिकत्वाची बाधा झालेली असल्यामुळे तसले लिखाणकर्त्या पत्रकाराला साहित्यिकाचा दर्जा द्यायला एके काळी खळखळ होत असे, असे ऐकिवात आहे. पण अलिकडच्या वेगाने झपाटलेल्या काळात वृत्तपत्राचे रकानेच साहित्य सोनियाच्या खाणी झालेल्या आहेत तेव्हा त्या लिखाणाला साहित्यत्वाचा नकार देणार कशाच्या आधारावर? विशेषतः त्यातील काही वेचक वाङ्मय ग्रंथगत झाले आणि साहित्यास्वादाच्या निखळ निकषांवर पारखून बघितले तर कोणतेच हीण ते केवळ वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते यास्तव दाखवता येत नाही.

सौ. सुहास नाईक यांचे 'धुन' वाचले आणि हरवून गेलेल्या मनाला प्रथम जाणवले ते हे की, ही काही नवी, आगळी हाताळणी आहे. हा साहित्यिक आविष्कार वृत्तपत्रात प्रकटलेला असला तरी त्यामुळे वृत्तपत्रीय आकृतीबंधाच्या मर्यादांनी जखडून तो कुठे बंदिस्त, गुदमरलेला वाटत नाही. वृत्तपत्रीय लिखाणांच्या विषयांची, आशय अभिव्यक्तींची छाया त्यावर कोठे पडलेली नाही. आजचे वृत्तपत्र उद्या रद्दी, शिळे बनते. पण 'धुन' मधील ललित निबंधांचा ताजेपणा, तरतरीत टवटवीतपणा इतका प्रसन्नपणे खुलतो की लेखिकेने 'तारा जुळवताना' (प्रास्ताविकात) 'वृत्तपत्रीय स्फुटांसारखे माझे हे लेख 'मुंबई सकाळ' मधून जेव्हा प्रसिद्ध होत होते' हा उल्लेख केला नसता तर ते वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले आहेत हे जाणवलेही नसते. ते स्फुटासारखे म्हणायचे कारण लेखिकेने तसे म्हटले आहे. नाहीतर स्फुटांचा 'प्रासंगिकपणा' वा 'अभिनिवेश' त्यात नाही. संगीतातील 'धुन' जशी मोकळी, स्वच्छ, स्वैर वाटते तसेच हे ललितनिबंध अगदी स्वाभाविक, सहजोद्गार—संगीताशी आणि काव्याशीही लय जुळविणारे भासतात. त्यांना निबंध म्हटले तरी त्यांनी स्फुटांच्या आकाराच्या, आवरतीच्या मर्यादा सांभाळलेल्या आहेत. पण काव्याच्या आविष्कारात जसा त्याचा आकृतिबंध जाचक होत नाही, उलट त्या सीमाही सुंदर दिसतात. तशीच गत मर्यादा नसतानाही त्या सांभाळलेल्या स्फुटितांमध्ये जाणवते मिनिएचर पेंटिंग (लघुचित्र) किंवा 'बोनसाय' ही जशी एक मर्यादशील असूनही संपूर्ण कलाकृती असते तशी पूर्णता 'धुन' मधील लेखांना आहे. ध्रुववृत्ताजवळच्या प्रदेशातील वनस्पती वर्षभरात केवळ दीडदोन महिन्यांचाच उबदारपणा अनुभवतात आणि तेवढ्यात बीजापासून फळापर्यंतचे आपले सारे जीवनचक्र पूर्ण करितात—कोणताही रितेपणा न उरविता—तशीच या स्फुटितांची तीनशे साठ अंशांची परिक्रमा संपूर्ण होते.

या ललितनिबंधाचे स्वरूप तसे तरलच म्हणावे लागेल. प्रस्ताविक लिहिताना श्री. मंगेश पाडगावकरांनी लिहिले आहे, 'हे सर्व लेखन कवितेला खूपच जवळचे आहे.' वृत्तपत्रातून लेख प्रसिद्ध झाले तेव्हा वाचणारे लेखिकेला विचारत, 'हे लेख आहेत की कथा आहेत?' साहित्यप्रकारांच्या सीमा या सहजलेखात सरमिसळून गेल्या आहेत. मुंबईच्या खचाखच भरलेल्या लोकल गाडीतून अवघडलेल्या अवस्थेत नोकरीसाठी प्रवास करताना अंतर्यामी स्फुरलेल्या वाटेल त्या विषयांवर—'कबुतरे', 'फुगा', 'सावली' पासून 'संस्कृती', 'आभाळ' 'निर्वाण' पर्यंत संवेदनाशील मनाला जे काही भावले ते लेखिकेच्या प्रासादिक शब्दरूपात व प्रसन्न शैलीत इथे अवतरले आहे. कोणताही संदेश देण्यासाठी, जीवनविषयक दृष्टी वा तत्त्वज्ञान मांडण्यासाठी हा आटापीटा नाही. तरीही 'बळेच पिळण्यात काही अर्थ नाही; हे मधाचं पोळं मात्र कधीच आटू नये...' 'पण एवढं मात्र खरं की, झाडापेक्षा उंच इमारती माणूस बांधायला लागला तेव्हापासून तो झाडाच्या सावलीला मुकला'...'ज्या मातीत आम्ही वाढलो त्या मातीत खत होण्याचं भाग्य आम्हाला मिळालं'... 'ती एकदा प्रकृती होती, नंतर ती संस्कृती म्हणून मिरवली, पण आता मात्र ती झाली होती विकृती...' अशासारख्या अर्थवाही अखेरो असणारे लेख काहीच सांगून जात नाहीत, असे कसे म्हणता येईल? त्यामुळे वरवर सहजासहजी वाचून टाकावे असे वाटणारे हे छोटेखानी पुस्तक हातात घेतले की खाली ठेववत नाही आणि छोटे असूनही संपवून टाकावेसे वाटत नाही!

— दा. सी. देसाई

धुन
लेखिका : सौ. सुहास नाईक
अपर्णा प्रकाशन
गोरेगाव, मुंबई
पृष्ठ : ८२, किंमत : १५ रु.




# रंगभूमी

## अभिनय आणि दिग्दर्शन यांचा वेगळा स्पर्श लाभलेला प्रयोग

# बेइमान

वि. भा. देशपांडे

---

व्यवसायिक रंगभूमीवर ज्या नाटकांनी स्वतःच्या गुणवत्तेवर एक निश्चित स्वरूपाचे स्थान मिळवले आहे, अशा नाटकांमध्ये वसंत कानेटकरांचे 'बेइमान' हे एक लक्षवेघी नाटक. लक्षवेधी होण्याची दोन कारणे होती. एकतर या नाटघलेखनाच्यासाठी कानेटकरांसमोर ज्याँ अनुई या नाटककाराचे बेकेट या नाटकाचा आराखडा स्थूलमानाने होता आणि दुसरे म्हणजे नाटयसंपदा या संस्थेने नामवंत कलावंत घेऊन प्रयोगाची गुणवत्ता एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवली होती.

अनुईच्या बेकेटमध्ये मूळ संघर्ष आहे तो राजसत्ता आणि धर्मसत्ता यांच्या संदर्भात दोन मित्रांमध्ये घडलेला तणाव. भारतीय जीवनात अशा संघर्षाची पार्श्वभूमी गतकालात शोधावी लागते. कानेटकरांनी संघर्षाचे तपशील आणि काहीशी दिशा बदलून नाटकाचा आराखडा वेगळाच तयार केला. दोन मित्रांच्या स्नेहभावात मालक आणि मजूर यांच्या संघर्षावर नाटक उभे राहिले. मालक आणि मजूर यांच्यातील संघर्षाचे स्वरूप कालपरत्वे बदलत असले तरी त्याचा ढाचा पूर्णपणे बदललेला नाही. त्यामुळे आणि त्यातील मैत्रीच्या घट्ट तत्त्वामुळे या नाटकाच्या ताजेपणाचे आकर्षण बराच काळ टिकणारे आहे.

नाटयसंपदा आणि रसिकरंजन या दोन नाटयसंस्थांच्या सहयोगाने 'बेइमान' चे नवे प्रयोगरूप उभे राहिले. पूर्वीपेक्षा आताच्या प्रयोगात बरेच महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. पूर्वी दिग्दर्शक म्हणून पुरुषोत्तम दारव्हेकर होते. आता दिग्दर्शनाची जबाबदारी आणि धनराज या महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखेची जबाबदारी मधुकर तोरडमल यांनी स्वीकारली आहे. पूर्वी आशा काळे, सुधा करमरकर या कलावती प्रयोगात होत्या. आता जान्हवी खांडेकर, माधवी गोगटे ह्या आहेत; परंतु नव्या प्रयोगातले बदल, हे केवळ कलावंतांच्या बदलापुरते नाहीत तर त्याहीपेक्षा अधिक गांभीर्याच्या पातळीवरचे, नाटकाचा अर्थ आणि अन्वयार्थ लावण्याच्या पातळीवरचे आहेत. प्रा. मधुकर तोरडमलांनी बेइमानच्या नव्या प्रयोगाला वेगळा अन्वयार्थ, नवा स्पर्श देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. मुख्यतः हे नाटक मालक-मजूर संघर्षाचे दर्शनी रूप घेऊन येत असले तरी मैत्रीचा चिवट धागा किती आणि कसा मजबूत आहे यावर त्यांनी सारा भर दिला आहे. धनराज आणि चंदर हे लहानपणापासून एकत्र वाढलेले, सख्ख्या भावासारखे असलेले; पण पुढे मोठेपणी तात्त्विक संघर्षाची, जीवनमूल्यांची कसोटीची वेळ येते, तेव्हा त्यांच्यात अंतर पडत जाते. दोघेजण दोन दिशांना, दोन टोकांना परस्परविरोधी भूमिका घेऊन उभे राहतात. त्या भूमिकांवरून आपापल्या खेळी खेळतात. तरीही त्यांच्यातला मैत्रीचा धागा त्यांना एकमेकाकडे खेचत राहतो. यामध्ये मित्र आणि मैत्री यांचा आत्मसन्मान राखण्याचा यत्न तोरडमलांनी आपल्या दिग्दर्शनाने केलेला आहे. म्हणजे हे नाटक केवळ घटनांचे, विशिष्ट व्यक्तिरेखांचे, विशिष्ट विषयाच्या रिंगणात फिरणारे न राहता ते मूल्यात्मक जाणिवेला स्पर्श करणारे झाले. मैत्रीसाठी मित्र जपावाच लागतो; पण मित्र गेल्यावरही मैत्रीचे मूल्य चिरकाल टिकणारे असते. मला वाटते कानेटकरांनी ज्यावेळी बेकेटवरून मराठीत काही नाटयरूपाने घेण्याचा विचार केला असेल तेव्हा त्यांच्याही मनी हेच मैत्रीचे सूत्र मूल्यरूपाने असावे. मूळच्या संहितेत तशा खुणा जरूर आहेत. त्या तोरडमलांनी हेरल्या आणि दर्शनरूपाने व्यक्त केल्या.

वेगळ्या दिग्दर्शनाच्या स्पर्शाने प्रयोगाचे सारे रूपच कसे पालटते ते या नव्या प्रयोगात अनुभवाला येते. तोरडमल यांचा धनराज आणि प्रभाकर पणशीकरांचा चंदर या दोन्ही व्यक्तिरेखा प्रभावीपणाने आविष्कृत झाल्या हे निराळे सांगण्याची गरज नाही. हे दोन्हीही कलाकार अभिनयाच्या क्षेत्रात तुल्यबल आहेत; पण त्यांनी व्यवसायातल्या स्पर्धेपोटी एकमेकावर मात करण्याचा यत्न केला नाही. अभिनयाची जुगलबंदी झाली ती अतिशय निरोगी स्तरावर! आणखी एक महत्त्वाचा भाग जाणवला तो म्हणजे चंदरची व्यथा किंवा ती एकूणच व्यक्तिरेखा अधिक गडद प्रभावी झाली. पणशीकरांनी ज्या पद्धतीने आपली स्वगते पेश केली त्यातून ती व्यथा आणि नाटकाचे सूत्र अधिक नेमके व्यक्त होत गेले. तसेच चंदर आणि बकुळी या दोघांचे संबंध पूर्वीच्या प्रयोगात अकारण संशयास्पद वाटायचे, ते आता तसे न ठेवता गुरू-शिष्य या पवित्र नात्यात आणल्याने चंदर आणि बकुळी या दोन्ही व्यक्तिरेखांना स्वतंत्र वजन आले.

या प्रयोगात नेपथ्य, पार्श्वसंगीत यांचा केलेला वापर, तसेच पात्रांच्या वेशभूषेचा विचार प्रयोगाची रंगत वाढवणारे ठरले. नेपथ्य पांडुरंग कोठारे यांचे आहे, तर संगीत (कै.) सुरेन्द्रकुमार हेन्द्रे यांचे (पूर्वीच्या प्रयोगाच्यावेळचे) आहे. धनराजच्या घराचे नेपथ्य विशेष ध्यानात राहणारे आहे. त्यातल्या पायऱ्यांचा, खुर्च्यांचा तसेच क्लोज सर्किट इत्यादींचा वापर कल्पक होता.

हा प्रयोग पाहताना एक गोष्ट मनाशी गृहीत धरावी लागते ती म्हणजे नाटकातल्या व्यक्तिरेखांची वये आणि प्रत्यक्ष कलाकारांची वये यातील अंतर. धनराज, धनवंती आणि चंदर हे तिघेही एकाचवेळी कॉलेजमध्ये शिकत होते, त्यातूनच एका प्रेमकहाणीचा छोटा अंतःप्रवाह नाटकातदेखील वाहात राहिला. धनवंतीच्या भूमिकेत जान्हवी खाडेकर होती. तिचा रंगभूमीवरचा वावर आणि मुद्राभिनय जितका प्रभावी वाटतो तितका तिचा शब्द परिणामकारी वाटत नाही. कदाचित आसपास दोन मातबर कलाकार असल्यानेही तसे झाले असेल. काही प्रयोगानंतर तो शब्द अधिक मोकळा, धारदारही होईल. बचुलीच्या भूमिकेतील माधवी गोगटेने पहिल्या अंकातील आपले स्वरूप आणि नंतरच्या अंकातील होत गेलेले बदल चढत्या श्रेणीने व्यक्त केले.

प्रयोगात सर्वात खटकणारा भाग म्हणजे रावसाहेब सोनटक्के याच्या व्यंगात्मक विनोदाचा वापर आणि तिसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशात कॉम्रेड जगदाळे आणि बचुली याच्यातील मारण्याच्या कृतीतून मिळवलेले हशे. या गोष्टी टाळता आल्या असत्या तर प्रयोगाची गुणवत्ता आहे त्यापेक्षाही काहीशी अधिक वाढली असती !

परंतु हे दोष ढोबळ आहेत, दुरुस्तीतले आहेत. एकूण प्रयोगाचा एकत्रित परिणाम प्रेक्षकाला खिळवून ठेवणारा आहे.

---

## सत्तांध

---

रत्नाकर मतकरी यांचे सत्तांध हे नाटक वर्तमान समाजस्थितीतील एका भागावर प्रकाशझोत टाकणारे आहे नाटकाच्या नावावरून राजकीय जीवनावरचे हे नाटक असेल असा काहीसा तर्क प्रथमदर्शनी होतो. पण केवळ काही प्रमाणातली राजकीय पार्श्वभूमी आणि दोन व्यक्तिरेखांचा वापर यामध्ये आहे.

नाटकामध्ये खास भर आहे तो एका तरुण शिक्षिकेने रेल्वेच्या प्रवासात पाहिलेला खून. त्या खुनाच्या आपण साक्षीदार आहोत ही अस्वस्थ करणारी गोष्ट तिला वाटते. आपण पाहिलेले सत्य जगाला सांगणे अगत्याचे आहे असे तिला प्रामाणिकपणाने वाटते आहे. ते सत्य सांगताना होणाऱ्या गुलागुतीवर नाटक उभे राहिले आहे या नाटकात काही प्रमुख घटना आहेत. पण नाटक घटनांमध्ये अडकून पडलेले नाही. घटना या आधार म्हणून किंवा पूरक म्हणून वापरून मधुरा या शिक्षिकेच्या मानसिक आंदोलनाचा प्रवास केंद्रवर्ती केलेला आहे. एका बाजूने ती तशी निरागस आहे. तिला गावातल्या कोणत्याच घटकाचा रंग नाही. पण जे आपण पाहिले ते भयानक आहे, माणुसकीला सोडून आहे. गरिबावर असा अन्याय होणे चांगले नाही असा साधा सरळ विचार तिच्या मनात आहे. समाजातला निरपराध माणूस सत्ताधीशाकडून अकारण मारला जातोय आणि आपण पाहण्यापलीकडे काहीही करू शकत नाही. निदान यातले जे सत्य आहे ते तरी आहे तसे जगाला सांगावे अशी तिची भूमिका आहे. पण आत्ताच्या जगात सत्य इतक्या सरळपणाने सांगण्याची परिस्थिती नाही. समाजातले विविध घटक या सत्याला विरूप करू शकतात. आपल्या जवळच्या सर्व शक्तीनिशी सत्य नष्ट करण्याच्या खटपटीत असतात आणि त्यात मधुरासारखी एखादी तरुणी होरपळली जाते.

अर्थात हे नाटक पहाताना मधुरा ज्या गावात राहते ते गाव, तिथले वातावरण, एकुलत्या एका वृत्तपत्रीय संपादकाची होणारी कोंडी, पारधी समाजाची होत असलेली होलपट आणि मधुराचे एकटेपण, निरागसपण हे सारे गृहीत धरायला हवे. मतकरींनी या संदर्भातले अनेक तपशील कथानकात गोवलेले आहेत. नाटक गतिमान आणि उत्कंठापूर्ण राखण्यासाठी आवश्यक ती रचना केलेली आहेच.

हे नाटक विषय-आशयामुळे जसे लक्ष वेधते, तसेच कलाकारांच्या अभिनयामुळे, दिग्दर्शनामुळे आणि प्रयोगतंत्रामुळे अधिक लक्षवेधी बनते हे निर्विवाद. मधुरा या मध्यवर्ती भूमिकेत अमिता खोपकर होती तिने आजवर काही व्यावसायिक नाटकातून कामे केली असली तरी या नाटकातल्या इतकी स्वतंत्र, मोठी आणि आव्हानात्मक भूमिका तिच्या वाट्याला क्वचितच आली असावी. ती एक चांगल्या अभिनय ताकदीची कलावती आहे हे तिने या नाटकात सिद्ध केले. तिने एकूणच भूमिकेचा तोल आपल्या आवाजाने, मुद्राभिनयाने उत्तम रीतीने राखला. त्यामुळेच नाटकातील घटना अनुभवाच्या पातळीपर्यंत जाण्यास मदत झाली. विनय पाडे या ( दिल्ली प्रशिक्षित ) कलाकाराने राजेश आणि भगवतराव ह्या दोन्ही भूमिका वेगवेगळ्या ढंगात पेश केल्या. त्यासाठी आवाजाचा केलेला वापर, बोलण्याची वेगळी लकब आणि पोशाखामुळे येणारे निराळेपण नाटकाला पोषक ठरले. चंदू पारखी ह्या नट छोट्या भूमिकेने सर्वांचे लक्ष वेधून घेतो ही आता सवयीची गोष्ट झाली आहे. या कलाकाराला अभिनयाची असलेली जाण विलक्षण आहे. आणखी दोन कलाकार विशेष लक्षात राहिले ते म्हणजे शकऱ्याच्या भूमिकेतील प्रभाकर सावंत आणि जयवंतीच्या भूमिकेतील कमलिनी फडके. सावंतांनी पारधी असलेल्या शकऱ्याच्या मनातील भीती यथार्थपणे प्रकट केली, तर कमलिनी फडके यांनी आपल्या आवाजाने, दिसण्याने जयवंती ही मोलकरीणचे काम करणारी बाई, शेवटच्या भागात राजेशशी असलेले मातृत्वाचे नाते यथायोग्यपणे दाखवून नाटकाच्या रंगतीतला आपला सहभाग उचलला.

मतकरी हे जसे या नाटकाचे लेखक आहेत तसेच ते त्याचे दिग्दर्शकही आहेत. नेपथ्य संकल्पनाही त्याचीच आहे. कथावस्तूतला आशय सूचित करणारी नेपथ्य योजना, भिंती–दाराचे रंग, पात्राच्या कपड्याचे रंग इत्यादी प्रयोगतंत्रातल्या अनेक गोष्टींचा तपशीलवार विचार त्यांनी केलेला आहे असे जाणवले. अशा अनेक गोष्टीमुळे एक चांगला प्रयोग पाहिल्याचे समाधान लाभले.

निर्मिती कमलिनी फडके यांनी ' नाटकघर या संस्थेद्वारा आपले पहिलेच व्यावसायिक नाटक उत्तमपणे पेश केल्याने अपेक्षा निश्चितच आहेत !

---

## घास रे रामा

---

मच्छिंद्र कांबळी याच्या भद्रकाली प्रॉडक्शनच्या वतीने घास रे रामा हे बाणकोटी भाषेतले नाटक पुण्यात नुकतेच पेश केले

गेले. वास्तविक हे नाटक मुंबईत येऊन बरेच दिवस झाले आहेत. नाटकाच्या प्रयोगानी सत्तरी गाठली आहे. त्यामुळे या नाटकाच्या अनेक तपशिलाचा भाग अनेकाना परिचित झाला असेल. त्यामुळे त्यातल्या फक्त महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्ष घेणे उचित ठरेल.

या नाटकात बाणकोटच्या भागात बोलली जाणारी कोकणी बोलभाषा वापरली आहे केवळ वेगळी बोलभाषा एवढेच या नाटकाचे वैशिष्ट्य नाही तर त्या निमित्ताने तिथल्या माणसाचे जीवनविशेष, स्वभावविशेष याचे परिणामकारी दर्शन घडवणे महत्त्वाचे आहे, ते घडते आहे. मुंबईसारख्या शहरात कोकणच्या खेडेगावातून आलेले रामा गडी कसे जीवन जगतात, किती प्रामाणिकपणाने आपली कामे करून आनंदात राहण्याचा यत्न करतात आणि आलेल्या दु खाना कसे सामोरे जातात याचे अतिशय मार्मिक चित्रण इथे घडले आहे. हे चित्रण घडवताना कोकणातील खेडेगावातील माणूस ' आणि मुंबईतील सुशिक्षित, नोकरदार, पैसेवाला माणूस ह्या दोन सस्कृतीतले दर्शनही अंतर्मुख करणारे आहे. नाटककार रमेश पवार यानी या दोन्ही जीवनसस्कृतीतील अनेक महत्त्वाचे तपशील नाटकाच्या रगतीसाठी जाणतेपणाने वापरले आहेत. शब्दसवादावरही त्याची हुकमत चांगली आहे. फक्त जाणवले असे की तिसऱ्या अंकाचा विस्तार जाणवण्याइतका लाब झाला आहे तो कमी करता येईल.

दिग्दर्शक म्हणून रमेश पवार याची कामगिरीही तितकीच महत्त्वाची आहे. सघ भावनेतून एखादे नाटक किती ठोस परिणाम करू शकते त्याचा प्रत्यय ह्या प्रयोग पाहताना येत होता. दिग्दर्शकाने एकूण नाटकाची गती उत्तम राखली आहे. त्याला कलाकारानी तितकीच उत्तम साथ दिली आहे दिलीप कांबळी, रघुवीर पारकर, लवराज कावळी, अशोक इदूलकर, प्रमोद कोरगावकर, विष्णू सावत, विद्या पटवर्धन, सजीवनी जाधव, लता अरुण आदी कलाकारानी आपल्या भूमिका चोख केल्या आहेत. पण सर्वात लक्षवेधी ठरला तो मच्छिंद्र कांबळीचा अभिनय. त्याचा रगमचावरचा वावर सहज आहे, शब्दफेक आणि विनोदासाठी हवे असणारे विनोदाचे भान त्याला कमालीचे आहे. ' विच्छा माझी 'त जसे दादा कोंडके याना ते भान होते. मच्छिंद्रने आता स्वत.चा खास प्रेक्षकवर्ग निर्माण केला आहे. वस्त्रहरण चाकरमानी आणि आता घास रे रामा या तीन नाटकानी त्याने केवळ स्वतःची प्रतिमा उचावलीय असे नव्हे तर मराठी रंगभूमीमध्ये बोलीभाषेतल्या नाटकाचे दालन समृद्ध करण्यास फार मोठा हातभार लावला आहे. या नाटकाचे रघुवीर तळाशीलकराचे नेपथ्य, यशवत देवाचे सगीत हा नाटकाच्या पात्रासारखाच सहज जाणवणारा भाग आहे. □

## शेअर्स - शेअर्स : पृष्ठ ४ वरून

परदेशी सहकार्य करारासबंधी दिलेल्या सवलती, उत्पादन सवलती, नवीन तंत्रज्ञान वापरण्यास देण्यात आलेले प्रोत्साहन, स्टील, कापड, कॉम्प्युटर, सिमेंट, औषधे वाहननिर्मिती यासारख्या धोरणात जे बदल केले गेले, त्याचा परिणाम त्या त्या उद्योगाच्या वाढीच्या दृष्टीने जरूर झाला आहे. वरकरणी शेअरचे भाव वाढायचे हे कारण वाटले तरी खरे कारण वेगळेच आहे. कारण दलाल, सट्टेबाज, उद्योग व्यवस्थापन याच्या मार्फत या व्यवसायात सतत हस्तक्षेप होतात व ते अनेकदा निकोप असतातच असे नाही. अशा प्रसगी वाढते गुतवणूकदार हे त्याच्या दृष्टीने वरदान ठरू शकतात. वाढते भाव हा साठेबाजीचासुद्धा एक भाग असू शकतो.

आणि आजचे दृश्य यापेक्षा वेगळे नाही. जसा शेअरमध्ये गुतवणूक करणारा वर्ग वाढत आहे तसाच चढ–उताराचा फायदा घेणारा वर्गही वाढत आहे. त्यामुळे जसजशी या वर्गात मोडणाऱ्याच्या सख्येत वाढ होईल, तसतशी एखाद्या उद्योगाची वास्तविक स्थिती... आणि त्याच्या शेअरची किमत याचा ताळमेळ राहीलच याची शाश्वती नाही

एकदरीत सर्वच बाबतीत आधुनिकीकरण हवे असणाऱ्या सरकारला 'शेअर व्यवहारातही' आधुनिकीकरण होत असलेले दिसत आहे. आधुनिकीकरणापेक्षा अमेरिकीकरण जास्त जवळचे वाटू लागते, तेच धोकादायक आहे. वॉल स्ट्रीटवर 'अर्नींगपर शेअरच्या'...इतके पट बाजारभाव असतो. पण अजून आपण फार मागे आहोत ' असे म्हणणारे दलाल अनेक आढळतील आणि हीच पार्श्वभूमी हानीकारक आहे कारण शेवटी असा प्रश्न आहे की, शेअरमधील गुतवणुकीकरता पैसा हवा व तो मिळवायला उत्पादन हवे आणि त्या उत्पादनाच्या पटीत शेअर किमती वाढल्या तर ठीक नाहीतर... सध्यातरी हा प्रश्न येणार नाही. कारण इथे दिसणारा फायदा लक्षात घेऊन इतरत्र केलेली गुतवणूक फिरवली जात आहे, यापुढे काही वर्षे ती फिरवली जाऊ शकेल इतकी ती आहे व त्यामुळे ती ' शेअर्सची ' मागणी सतत वाढवत ठेऊ शकेल आणि शेअरचे भाव अर्थातच चढे राहतील.

वाढत्या गुतवणूकदारामार्फत आलेला पैशाचा ओघ जर योग्य रीतीने वापरला गेला नाही आणि ह्या पैशाचा उपयोग काही वेगळा झाला... जो अनेक प्रकारे करता येतो तसे झाले तर गुतवणूकदाराना न्याय मिळेल का ? शेअरची तेजी जी अनेकांना आकर्षून घेत आहे, ती ' उद्योजक व दलाल ' याच्या सहकार्याचा... ज्याला ' बिझनेस टॅक्टिज् ' सुद्धा म्हणतात, त्याचा परिपाकही असू शकतो आणि अशा परिस्थितीत जो ' सटकन फायदा ' होत असतो तो कुठे तरी झीज सोसूनच. सध्याची ' चालना ' ही कुठल्या तरी झीजेवर आहे का उद्योगाच्या कर्तृत्वावर हे लवकरच दिसेल.

□

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

लीला पाटील

# रुजवणीचे दिवस आले!

(शिक्षक, शिक्षण आणि शिक्षणपद्धती या विषयावर चिंतन करणारे प्रा लीला पाटील यांचे लेख 'ऐलमा पैलमा शिक्षण देवा' या सदरातून प्रसिद्ध होत होते. जुलै महिन्यात प्रसिद्ध झालेला माणूसचा तरुण–तरुणी विशेषांक आणि त्यानंतरचा परिवर्तन विशेषांक यामुळे या सदरातील लेखाचे क्रमशः प्रकाशन स्थगित होते.

२१ लेख पूर्वी प्रसिद्ध झाले. या सदरातील हा बाविसावा लेख.)

¤

पाऊस येऊ घातला की, घरोघरी नवी रुजवण करण्याची तयारी होते. कुंडया, माती, रोपं यांचा शोध घेण, नव्या झाडासाठी खड्डे काढण जिकडे तिकडे चालू असतं. हे होत असतानाच जुनाट झालेली झाडे काढली जातात. काही नवी लावली जातात. झाडावर वाढलेली वाडगुळ उपटून फेकली जातात. मृग नक्षत्र आले की, हे सार पाहता पाहता मला शाळा आठवते पावसाची आणि शाळाची सुरुवात थोडी आगंमागं असली तरी जवळपास एकाच पंधरवड्यात असते. स्वाभाविकच मृगाच्या अपेक्षेनं बागाची जशी निगराणी चालू होते तशीच सुट्टीनंतर शाळा उघडणार म्हणूनही घराघरात तयारी चालू असते. गणवेश, पुस्तकं, वह्या, पावसाळी बूट, छत्र्या, रेनकोट, दुपारच खाण नेण्यासाठी डबा... घराघरात हे चाललय तसं शाळाशाळांत काय चालनं ? झाडझूड, इमारतीची डागडुजी इतकच ? हो, बव्हंशी इतकच. कारण सुट्टीनिमित्त बंद ठेवलेल्या या शाळा नावाच्या यत्रांना नवं काही करायचच नाही. फक्त तेच ते फेरे घेऊन पुन्हा मे महिना गाठायचा आहे. ना उकरण-खोदण नाही तोडण,-उपटण, वाढलेली वाडगुळे तोडायची नाहीत की, नवं रूजवण्यासाठी शोधण-आखणं नाही. घटेचे टोल, शिक्षकाचे वर्गावर जाणे-येणे, पुस्तकातील धडे मागच्यासारखेच पुन: एकदा वाचणं, अधूनमधून एखादा थातुर-मातुर प्रश्न विचारणं, विद्यार्थ्यांनी पुस्तकाची पान उलटण आणि शिक्षकानी विचारलेल्या प्रश्नाची त्याना अपेक्षित असलेली उत्तरं पाठ करण, नोटिसा ऐकण, वर्षातून दोनदा झेंडा फडकावण, थोराचे दिवस घालत रहाणं... वर्षानुवर्ष शालेय यत्राच्या चक्राचे फेरे थोडयाफार फरकान किंवा काही अपवाद वगळता असेच चालले आहेत

शालेय व्यवहाराचा हा कटाळवाणा चक्रनेमिक्रम बदलण्याची गरज नाही का ? या व्यवहारातील निर्ममता, रूक्षता, अचेनता, तोचतोपणा नाहीसा नाही का होऊ शकणार? निदान तो कमी तरी करता येईल का हो ? या प्रश्नाची उत्तरं शाळा चालविणाऱ्या मुख्याध्यापक-शिक्षकाच्या मनात शोधायला हवीत या मडळींनी आपल अध्यापन व आपल शिक्षकपण प्रभावी होण्यासाठी नवी माहिती, नवे सदर्भ, नवी साधन, नव्या जाणिवा यांची जितकी बेगमी उन्हाळी सुट्टीत केली असेल तितक त्याचे शिक्षकपण आकर्षक व त्यांच शिकवणं रंजक, सचेतन होईल. नुसती पुस्तकं वाचूनच मनुष्य नवं शिकतो अस नाही. नवी स्थळ पाहण, नव्या व्यक्तींना भेटणं, नव्या संस्था पाहणं, अनोख्या प्रसगाना सामोरं जाण, पूर्वीच्या वाचनाचा / प्रसगाचा / स्थळाचा म्हणजेच एकदरीत पूर्वानुभूतीचा पुनर्विचार करण, अशा कितीतरी मार्गांनी मनुष्य 'नवा' होत असतो, Regenerate होत असतो. नवे गध, नवा आकार, नवे रूप, नवे रस यांचा दरवळ माणसाच्या व्यक्तिमत्वाला सतत यावयाचा असेल तर प्रत्येक शिक्षकाचं व पालकाच Regeneration सारखं होत असलं पाहिजे. व्यक्तिमत्वात सतत नवी रूजवण होत राहिली पाहिजे.

नव्या रूजवणीची देखभाल खूप करावी लागते. रूजवणीचे उगवणीत रूपातर होण्यासाठी सतत सावध, कृतिशील रहाव लागतं. एखाद्या शिबिरात, कृतिसत्रात, व्याख्यानात, पुस्तकात, व्यक्तीत आपल्याला Regeneration चा एखादा स्फुलिंग मिळतो परतु घराच्या व शाळेच्या चक्रनेमिक्रमात आपण सावधतेन तो स्फुलिंग फुकरून सचेत ठेवत नाही. लवकरच तो विझून मनाच्या खोल तळाशी जाऊन गडप होतो. सस्थाचालक, मुख्याध्यापक, सहकारी-शिक्षक किंवा पालक याना चक्रनेमिक्रमातूनच विद्यार्थ्यांनी बाहेर पडून परीक्षेतील गुणांच्या पताका मिरवीत बाहेर पडाव अशी इच्छा– त्यामुळे ही मडळीही तुम्ही तो अमोल स्फुलिंग सचेत ठेवलाच पाहिजे अशी सर्वसाधारणपणे निकड लावीत नाहीत· उलट काहीवेळा तर असल्या चाकोरीबाहेरच्या स्फुलिंगाना त्याचा विरोधच असतो. परिणामत. शाळाशाळात शिकविणाऱ्या शिक्षकाना आपण एका आनददायक मार्गावरचे यांत्रिक आहोत अस न वाटता ते कटाळवाण्या प्रवासातले वर्षांचे टप्पे मोजीत असतात, सेवेत असूनही जणू सेवानिवृत्त असतात !

शिक्षणाच्या व्यवसायाचं मूळ स्वरूपच अस आहे की, ज्यात नित्यनूतनता, चिंतनशीलता, सृजन, आनद व कृती यांना खूप खूप अवसर आहे. काही शिक्षकानी सध्याच्या थोड्या निराशाजनक परिस्थितीतही शाळेत किंवा शाळेबाहेर काही उपक्रम कार्यवाहीत आणून स्वतःचा व विद्यार्थ्यांचा विकास साधून सृजनशीलता व आनंद यांची जोपासना केली आहे. हे उपक्रम आपण समजून घेतले तर कदाचित तुम्हाला-मलाही ते करून पाहावे, रुजवून पाहावेसे वाटतील. असे काही उपक्रम पाहू या ?

१) वर्षभर सहा झाड लावून किंवा लाववून घेऊन त्याचे संगोपन कराल ?

२) वर्षभरात एखादे प्रदर्शन माडण्याच योजाल का ?

३) वर्षभरात निदान चोवीस तासाचं श्रमसस्कारात्मक काम आखून त्याची गंमत अनभवू शकाल ?

४) वर्षभरात तुमच्या संपर्कात असणाऱ्या मुलाना निदान सहा नवीन खेळ शिकवाल ?

(५) वर्षभरात एखादा प्रकल्प करण्यास

मुलाना प्रोत्साहित कराल ?

(६) अंधश्रद्धा निर्मूलनासाठी एखादी फेरी काढता येईल ?

(७) जनगणमन व वंदेमातरम् या दोन गीताचा अर्थ आपल्या विद्यार्थ्यांना समजलाच पाहिजे असे मानाल ?

(८) दर महिन्याला एक संस्कारात्मक कहाणी सांगण जमू शकेल ?

(९) दर महिन्याला एक समूहगीत शिकवणं अवघड नाही ना ?

(१०) अंधश्रद्धा दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांना पथनाट्य करण्यास प्रोत्साहित करण जमेल ?

(११) आठवड्यात दोन तास चालणार क्रीडाकेंद्र चालविता येईल ?

(१२) लहानमोठ्या सुटीत छंदवर्ग चालविता येईल का ?

(१३) आकाशदर्शनासाठी विद्यार्थ्यांना आवाहन कराल ?

(१४) दर आठवड्याला एकदा पक्षीनिरीक्षणाचा अनुभव देता येईल ?

(१५) आजूबाजूच्या वनस्पतीचा परिचय करून द्यायला आवडेल ?

(१६) ५२ सेकदात राष्ट्रगीत म्हणण्याचा सराव विद्यार्थ्यांना देण आवश्यक आहे अस वाटतं ?

(१७) जवळच्या राज्यातील भाषेत असणारं एखादं गीत शिकवाल ?

(१८) जवळच्या राज्यातील मुलामुलींशी आपल्या विद्यार्थ्यांना पत्रमैत्रीसाठी उद्युक्त करू या का ?

(१९) विविध प्रकारे दगड, माती, पिस, पान, कविता, कोडी असा कोणत्याही प्रकारचा संग्रह करण्यासाठी प्रयत्नशील राहू शकाल ?

(२०) सर्व रंग व त्याच्या छटा आपल्या विद्यार्थ्यांना ओळखता आल्याच पाहिजेत अस तुम्हास वाटतं ?

(२१) महिन्यातून एकदा विद्यार्थ्यांनी एखादी पाककृती सामुदायिकरीत्या सिद्ध करण आवश्यक वाटतं ?

(२२) एकांताची अनुभूती विद्यार्थ्यांना देण आवश्यक आहे ?

(२३) ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येकानं आवश्यक तितक्याच उंच आवाजात बोलण्याची सवय लावता येईल ?

(२४) घरातील पाणी व विज याचा गैरवापर होणार नाही याबद्दल मुलाना दक्ष करणं जमेल ?

(२५) 'भारत माझा देश आहे' ही भावना सक्षमत करण्यासाठी योग्य अशी काही योजना सुचते आहे ?

(२६) झोपडपट्टी किंवा अनाथगृहातील काही मुलामुलींशी आपल्या विद्यार्थ्यांची बिरादारी व्हावी अस वाटत ?

(२७) जीवनदर्शनासाठी सहली काढता येतील ?

(२८) सकल्प करण व तो पाळण किती अवघड असत याची अनुभूती प्रत्येकाला वेगवेगळ्या संकल्पाच्या निमित्तानं देता येईल ?

जरा विचार करू लागलात की असे आणखी कितीतरी उपक्रम आपणाला सुचतील; परतु प्रश्न केवळ सुचण्याचा नाही. परीक्षेसाठी महत्त्वाचे असणारे प्रश्न परीक्षकाना अपेक्षित असणारी उत्तरं आणि परीक्षेत मिळणारी वरची किंवा त्याहूनही वरची श्रेणी यातच शिक्षण सामावल आहे, अशा विचारांनी तुम्ही पछाडले गेले असाल तर शालेय व्यवहाराच्या चक्रनेमिक्रमातच तुम्ही अडकून रहाल; परतु ज्याला शिक्षण म्हणतात ते देण्यासाठी क्रमिक पुस्तक व परीक्षा ही केवळ काही निमित्त असून विविध व्यक्तीच्या बाबतीत तीच निमित्तं उपयोगी पडतील अस नाही व एकाच व्यक्तीच्या बाबतीतही सर्वकाल तीच निमित्तं उपयोगी पडतील असही नाही अस आपण मानू तेव्हाच केवळ तीच चक्रनेमिक्रम नव्हे तर विविध उपक्रमाची वेळोवेळी योजनापूर्वक रूजवण व कष्टपूर्वक उगवण करणं जरुरीच आहे अस आपल्याला वाटेल. आपल्या विद्यार्थ्यांना अथवा सपर्कात असणाऱ्या मुलामुलीना मग तुम्ही-मी या उपक्रमासाठी आवाहन करू. हे उपक्रम साकार होता होता विद्यार्थी विचारकर्ते, प्रश्नकर्ते, शोधक बनतील. निरीक्षक होतील. सारी ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये वापरून ते शिकायला लागतील. काही शिकायचं म्हणजे ते शिकवाव लागतं या समजुतीतून त्याची सुटका होईल. हे सारं होता होता आपण शिक्षकही विमुक्त करणाऱ्या विद्येला सन्मुख होऊन खऱ्या अर्थी शिक्षक बनू. □

---

'सौम्य प्रकृतीची, सभा मोर्चे यांचा पिंड नसलेली ही बाई सावधगिरीनेच प्रवास करते. स्त्रियांवर किती अन्याय होतोय म्हणून छाती बडवून घेत नाही किंवा अत्याचाराच्या लाल भडक जखमा उघड्या करून मध्यमवर्गीय अलिप्तपणाला आव्हान देत नाही. हिच्या लेखनाची जातकुळी वेगळीच आहे. ती स्वत: सुशिक्षित मध्यमवर्गीय बाई आहे. आणि त्या वर्गाशी मर्यादित अनुभव विश्वावावतच ती चिंतन करतीय. रोजच्या आयुष्यातील एकेक पदर हलकेच उघडून ती नेमक्या मर्मस्थळी बोट ठेवतीय. दुखवण्याच्या अविर्भावाने नव्हे तर जागे करून अस्मिता फुलविण्याच्या ताकदीने. उमेद हरवून बसलेल्या मध्यमवर्गीय बाईशी सवाद साधायचा मंगलाबाईचा प्रयत्न आहे आणि त्यांना ती व्हेन गवसली आहे. तारा निश्चित जुळाल्या आहेत.'

**—छाया दातार**

रविवार सकाळ—१७ मार्च ८५

# कुंपण आणि आकाश

**मंगला गोडबोले**

**किमत २० रुपये**

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.**

चित्रपट

# 'ॲक्टर' अनिल कपूर

काही वर्षांपूर्वी 'एक बार कहो', 'शक्ती' अशा काही चित्रपटातून एक तरुण पडद्यावर आला होता. या चित्रपटानी बऱ्यापैकी धंदा केला; पण हा तरुण लक्षात रहाण्याचं काही कारण नव्हत. कारण कुठं नायकाचा मित्र, तर कुठं नायकाच्या मुलाची छोटेखानी भूमिका अशी एक—दोन प्रसंगापुरतीच त्याला संधी मिळाली होती. तसं पाहिल तर 'एक बार कहो' मध्ये एक थरारक सीन त्याच्या वाटयाला आला होता. धावत्या आगगाडीच्या टपावरून त्याला पळत जायच होतं या तरुणान तो प्रसंग धाडसीपणा दाखवून पुरा केला खरा, पण तो काही या चित्रपटाचा नायक नव्हता त्यामुळ त्याला अवाजवी महत्व येऊ नये म्हणून संकलन करून आगगाडीवरून धावणारे नुसते पायच प्रत्यक्ष चित्रपटात दाखवले गेले !

काही वर्षं उलटली आणि हा तरुण 'वो सात दिन' या चित्रपटाचा नायक बनून आला. प्रसिद्ध संगीतकार बनू पहाणाऱ्या भोळयाभाबडया, खेडवळ तरुणाच्या भूमिकेत त्याने चागले रंग भरले पाठोपाठ आला 'मशाल .' दिलीपकुमारसारख्या अभिनेत्यासमोर उभ राहून त्याच्या तोडीस तोड भूमिका त्यान करून दाखवली आणि त्या तरुणाचं —अनिल कपूरचं— स्थान हिंदी चित्रपटसृष्टीत पक्क झालं.

तसं अनिल कपूरच कुटुब सिनेसृष्टीशीच संबंधित असलेलं. राजकपूर वगैरे त्याचे नातेवाईकच; पण खुद्द त्याचे वडील सुरिंदर कपूरही निर्माते म्हणून चित्रपटसृष्टीत स्थिरावलेले. असं असूनही इतर स्टार—पुत्रासारखा याचा फायदा अनिल कपूरला झाला नाही. आपल्या मुलाला आपणच प्रकाशात आणण्याची कल्पना कदाचित सुरिंदर कपूरना पसंत नसावी. त्यामुळच चित्रपटात स्थान मिळवण्यासाठी अनिलला ५—६ वर्षं झगडावं लागलं.

आपण अभिनेता व्हायच हे अनिलन लहानपणापासूनच पक्क केल होतं. चित्रपटाचं वेड घरात पूर्वीपासूनच होतं, त्यामुळं याला विरोध होण शक्य नव्हतंच. अनिलचा भाऊ बोनीही वडिलासारखा निर्माता व्हायची स्वप्नं बघत होताच.

मग अनिलन चित्रपटसृष्टीत प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अभिनयाचं खणखणी नाणं त्याच्याजवळ होत, पण नायक बनण्यासाठी आवश्यक देखणा चेहरा नव्हता परिणामी त्याला छोटया, अगदी नगण्य भूमिकांवर समाधान मानाव लागल. आपल्या मुलानं केलेला संघर्ष पुरेसा आहे असं सुरिंदर कपूरना वाटल असाव अनिलला नायक बनवणाऱ्या चित्रपटाची योजना त्याच्या डोक्यात घोळत होती, पण यावेळेस त्याची आर्थिक परिस्थिती चागली नव्हती. लागोपाठ आपटलेल्या चित्रपटामुळे सुरिंदर कपूर अडचणीत सापडले होते आणि त्यामुळं अनिलला घेऊन चित्रपट काढण्याची योजना लांबणीवर पडली.

दरम्यान 'हम पांच'नं सुरिंदर कपूरना हात दिला आणि त्यानी 'वो सात दिन'ची जुळवाजुळव सुरू केली. याच दरम्यान यश चोपडांनी अनिलला आपल्या 'मशाल'साठी करारबद्ध केल आणि या दोन चित्रपटानी त्याच्या आयुष्याची दिशाच बदलून टाकली.

'वो सात दिन'नं बऱ्यापैकी धंदा केला. 'मशाल' मात्र व्यावसायिकदृष्टया तितका यशस्वी ठरला नाही. पण त्यातला अनिल कपूरनं रगवलेला राजा मात्र सगळयांच्याच प्रशंसेला पात्र ठरला. 'मशाल'मध्ये एक प्रसग आहे. दिलीपकुमार राजाला (अनिल कपूर) विचारतो, 'तुझ्या घरात कोणकोण आहे ?' 'आई-वडील लहानपणीच वारले. मी एकटाच आहे' हे राजा वरवर मोठया बेफिकीरपणे सागतो खरा, पण तोड फिरवून डोळयातले अश्रूही लपवतो. हा प्रसग अनिल कपूरने सुदर रंगवला आहे. वरवर बेफिकीर गुड पण आतून प्रेमळ राजा अनिल कपूरनं अप्रतिम साकार केला. दिलीपकुमारच्या चित्रपटात दुसऱ्या अभिनेत्याना फारसा वाव नसतो. पण अनिल नवोदित असूनही त्याला दिलीपकुमारच्या तोडीची भूमिका मिळाली आणि प्रत्येक फ्रेममध्ये त्याच्या तोडीस तोड उभ राहून अनिल कपूरनं त्या सधीच सोनं केल. 'मशाल' खऱ्या अर्थानं लक्षात राहिला तो या दोघाच्या अभिनयातल्या जुगलबंदीमुळंच.

आपल्या पहिल्या दोन चित्रपटानी अनिल कपूरचं नाव अभिनेता म्हणून सर्वतोमुखी झालं असलं तरी खऱ्या अर्थानं यशस्वी चित्रपट त्याला अजून मिळालाच नव्हता. दरम्यान त्यानं अनेक प्रसिद्ध बॅनरचे, प्रसिद्ध दिग्दर्शकाचे चित्रपट मिळवले. त्यातले 'लव्हमॅरेज' 'अदरबाहर', 'युद्ध' हे चित्रपट प्रदर्शितही झाले. पण ना ते चित्रपट गाजले, ना त्यातल्या अनिलच्या भूमिका वैशिष्टयपूर्ण होत्या. नवीन नायकाच्या लाटेत तो बाजूला फेकला जातोय की काय, अस वाटत असतानाच 'साहेब'च्या यशामुळ त्यानं पुन्हा एकदा आघाडीच्या अभिनेत्यात स्थान पटकावलं आहे

अनिल कपूरकडे आज 'अमिताभचा वारसदार' म्हणून पाहिल जातं. अमिताभच्या निवृत्तीमुळं रिकाम्या झालेल्या एक नबर पदासाठी तो आणि जॅकी श्रॉफ, सनी देवल यांच्यातच खरी चुरस आहे. जॅकीच्यामागं 'हिरो'च्या प्रचड यशाची पुण्याई अजूनही उभी आहे. तर 'बेताब' नतर लागोपाठ अपयश स्वीकारलेला सनी 'अर्जुन' मधे परत दिमाखात उभा राहिला आहे.

पण आपल्या या प्रमुख प्रतिस्पर्ध्यांपेक्षाही अनिल कपूर अभिनयात निःसंशय श्रेष्ठ आहे. विनोदी छापाची भूमिका असो (अदर-बाहर) रोमॅंटिक भूमिका असो (मुहब्बत) किंवा ॲंग्रीयगमॅन रंगवायचा असो (मशाल) अनिल कपूर सारख्याच सहजतेने या भूमिका रंगवताना दिसतो. जॅकीचा मख्ख चेहरा, विचित्र हावभाव, सनीच्या अभिनयातला कृत्रिमपणा यामुळे अभिनेता अनिल अधिकच उठून दिसतो.

आजच्या बहुतेक लोकप्रिय अभिनेत्यात स्वतःच्या ताकदीवर भूमिका रगवायची क्षमता कमी आढळते. दिग्दर्शक चागला भेटला,

त्याने मेहनत करवून घेतली तरच हे नायक बरी कामगिरी वठवू शकतात. सनी देवलच उदाहरण यादृष्टीन पुरेसं बोलकं आहे. 'सनी', 'मंझिल मंझिल', 'जबरदस्त' मध्ये बधीर चेहऱ्यान वावरणारा सनी 'बेताब' आणि 'अर्जुन' मध्ये सुखद वाटतो हा काही योगायोग नव्हे. राहुल खेल या दोन्ही चित्रपटाचा दिग्दर्शक आहे हे याच खरं कारण जॅकीचीही स्थिती अशीच, किंबहुना अधिकच वाईट आहे या पार्श्वभूमीवर दिग्दर्शक, चित्रपट कसाही असला तरी आपलं काम चांगलच असणार हा विश्वास प्रेक्षकाच्या मनात निर्माण करणारा अनिल कपूर म्हणूनच वेगळा वाटतो.

'अभिनेता' म्हणून अनिल या दोघापेक्षा नि:संशय उजवा असला तरी 'स्टार' म्हणून तो डावाच आहे. जॅकीच देखणेपण किंवा सनीच ग्लॅमर त्याच्याजवळ नाही. त्यामुळे 'स्टार' पेक्षा 'अॅक्टर' हे विशेषणच अनिल कपूरला अधिक शोभेस आहे.

आताचा हिंदी चित्रपट हळूहळू का होईना, पण निश्चित वेगळं वळण घेऊ पहातो आहे. निव्वळ देखण्या चेहऱ्यापेक्षा अभिनयाची मागणी करणाऱ्या भूमिकाची संख्या वाढते आहे. अभिनयाचा दर्जा आणि व्यावसायिक दृष्टी याचा साधा जुळवून नसिरूद्दिन शाह, राज बब्बर, ऋषी कपूर, मिथुन चक्रवर्ती यानी चित्रपटसृष्टीत आपला जम बसवलाच आहे. याच्याच रांगेत शोभून दिसणारा अनिल कपूर या दोन गोष्टीचा मेळ कसा घालतो हे पहाण महत्त्वाचं ठरणार आहे. त्यादृष्टीन शेखर कपूरचा 'जोशीले', सुभाष घईचे 'कर्म', 'मेरी जंग' आणि महेश भट्टचा 'ठिकाना' ह्या त्याच्या चित्रपटाकडे त्याच्या चाहत्याची नजर असेल. हे चित्रपट यशस्वी ठरले तर अनिल कपूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला जाईलच पण ते अयशस्वी ठरले तरी फारसा फरक पडणार नाही. कारण अस्सल अभिनेता कधी मरत नसतो हे त्याच्या आजवरच्या वाटचालीतून स्पष्ट झालेलच आहे.

— सीमा कुलकर्णी

# सागर

## अचूक पात्रयोजना

गल्लाभरू चित्रपटाची निर्मिती करूनही ज्या मोजक्या दिग्दर्शकाचा अजूनपर्यंत कलात्मकतेचा कोपरा शाबूत आहे अशा दिग्दर्शकात रमेश सिप्पी मोडतात. आपल्या प्रत्येक चित्रपटानं 'मायापुरी' गाजवणारे सिप्पी आता 'सागर' हा महत्त्वाकांक्षी चित्रपट घेऊन दोन वर्षानंतर प्रेक्षकासमोर आले आहेत.

सागरतीरावर कोळ्यांची वस्ती असलेल गाव. या गावात हॉटेलवाल्याची मुलगी मोना (डिंपल कपाडिया) आणि व्यवसायाने मच्छिमार असलेला राजा (कमल हसन) राहतात. हे दोघं बालपणीचे सवंगडी. जाणता झाल्यावर राजा मोनाच्या प्रेमात पडतो. पण तो तसं प्रत्यक्ष बोलून दाखवत नाही. रवी (ऋषीकपूर) हा मच्छीमारी करणाऱ्या एका बड्या कपनीच्या मालकिणीचा नातू व्यावसायिक संबंध पूर्णत: शत्रुत्वाचे असूनही राजा आणि रवी याची फिल्मी स्टाईल मैत्री. दरम्यान रवी आणि मोना एकमेकाच्या प्रेमात पडलेले. प्रेमाच्या त्रिकोणाचं या दोघा नायकांना आकलन झाल्यावर मग त्यागाची चढाओढ आणि शेवटी 'व्हिलन के हाथो' राजाचा मृत्यू. इतकी घिसीपिटी आणि कितीही ताणता येईल अशी सोयिस्कर कथावस्तू. रमेश सिप्पीनी मात्र त्याचं दृश्यस्वरूप फारच देखणं आणि वेगवान केल आहे. सिप्पीच्या चित्राचा विशेष हा की ते घटनाची मांडणी इतकी चोख आणि वेगवान करतात की प्रेक्षकाला बरवाईट ठरवायला वेळच मिळत नाही! वास्तवाचा पुकारा करत सिप्पीनी अनेक उत्तान दृश्याची मालिका पेश केलीय. ती चित्रपटाला अनावश्यक असली तरी 'बॉक्स ऑफिस'साठी आवश्यक आहे.

जावेद अख्तरच्या लेखणीला या चित्रपटात धार आल्यासारखी वाटते. हमखास टाळ्या घेणारे अनेक संवाद जावेदनी कुशलतेने पेरले आहेत. 'सागर'चं छायाचित्रण एस्. एम्. अन्वर याचं आहे. ते शब्दश: नेत्रदीपक झालं आहे जावेदची लेखणी जिथ पोहोचू शकली नाही तिथं अन्वरचा कॅमेरा पोहोचलाय. रवी आणि मोनाची पहिली भेट ही नि:शब्द तरीही आशयघन झालीय ती अन्वरच्या कॅमेऱ्यामुळे.

रिवाजाप्रमाणे सिप्पीच्या चित्राच संगीतही राहुलदेव बर्मन याच्याकडे आहे 'बेताब' नतर प्रथमच आर. डी. ची गाणी श्राव्य वाटतात. 'ओ मारिया', 'चेहरा है या चांद खिला', 'सागर किनारे' 'आओ ना पास आओ ना', ही चार गाणी चित्रपट प्रदर्शित होण्याआधीपासूनच गाजलेली आहेत. या गाण्याच चित्रिकरणही चागलं झालय. सरळ साध्या रचनेमुळं ती लक्षात राहतील. पार्श्वसंगीतातही बर्मननं आपलं वेगळेपण दाखवलय.

या चित्रपटाच नाव 'सागर' का ठेवल हा सशोधनाचा विषय व्हावा. कारण सागर किनाऱ्यावर रुपेरी पडद्यातून ज्या अगणित प्रेमकथा सादर झाल्या त्यातलीच ही एक कथा. यात तिचे पृथगात्म वैशिष्ट्य शून्य. जर दिग्दर्शकाला सागराची भरती ओहोटी आणि पात्रातील भावनिक ताणतणाव याचा अन्योन्य सबंध जोडायचा असेल तर त्यात तो पूर्णत: अयशस्वी झाला आहे.

अचूक पात्रयोजना हे सिप्पी महाशयाच वैशिष्ट्य मानल जात. 'सागर' मध्येही त्यानी व्यावसायिक धूर्तपणान एके काळी रुपेरी पडद्यावर इतिहास घडवून गेलेली ऋषीकपूर–डिंपल कपाडिया ही जोडी १२–१३ वर्षानंतर प्रथमच आणली आहे यामधील सिप्पीचा धद्देवाईक हेतू लक्षणीय आहे. 'बॉबी'च यश ते पुन्हा वसूल करू पाहत आहेत आणि आपल्या अशिक्षित प्रेक्षकवर्गामुळे ते त्यात यशस्वीही होतील.

कमल हसन कथाकार जावेदनी उजव्या हातानं चितारलेल्या राजाच्या भूमिकेत दिसतो. प्रेक्षकाची सगळी सहानुभूती या एकट्या राजाच्या खाती जमा होते. ही भूमिका हसननं चागली उभीही केलीय पण त्याच्या इतकाच अभिनयात चोख असलेला ऋषीकपूर मात्र अभिनयाची अजिबात मागणी न करणाऱ्या रवीच्या भूमिकेत आहे सपूर्ण चित्रपटभर हा इसम प्रेम तरी करतो किंवा दारू तरी पितो. याशिवाय त्याला विशेष काम नाही.

शफी इनामदार या चित्रपटात 'अॅक्टिंग व्हिलन' आहे. शफीची ही कामगिरी पूर्णत: निराशा करणारी आहे. खलनायकानं नेहमी खर्जातच बोललं पाहिजे, कणमात्रही हसता कामा नये अशा भाबड्या समजुतीने तो या चित्रपटात वावरतो.

आणि शेवटी डिंपल कपाडिया... 'बॉबी' नतर प्रथमच तिला इतकं 'सविस्तर' काम मिळालय सागरमधील 'मोना' 'बॉबी'शी खूप जवळच नातं सागणारी आहे. त्यामुळे डिंपलला भूमिका वठवताना फार सायास पडले नसावेत. शिवाय ती (मेक–अपच्या किमयेनेही असेल पण–) दिसलीयही चागली! डिंपलन आता पुन्हा सिद्ध केलय की, ती सौंदर्य आणि अभिनय यामधील दुर्मिळ सगती आहे

एकूण हा चित्रपट प्रेक्षकासाठी आहे समीक्षकासाठी नव्हे!

— मिलिद संगोराम

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा
१९८४ मधील
शिवराम महादेव परांजपे
ग्रंथ पुरस्कार लाभलेलं पुस्तक

# निर्माणपर्व

लेखक - श्री. ग. माजगावकर

• मूल्य चाळीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

नावडकर